
# लैंगिक गुन्ह्यांची पोलीस नोंदणी



## लैंगिक गुन्ह्यांविषयीची प्रक्रिया आणि पोलिसांचे उत्तरदायित्व या विषयावरील मार्गदर्शिका


CHRI
Commonwealth Human Rights Initiative
working for the practical realisation of human rights in the countries of the Commonwealth

आली
AALI

# कॉमनवेल्थ ह्युमन राईट्स इनिशिएटिव्ह

कॉमनवेल्थ ह्युमन राईट्स इनिशिएटिव्ह (CHRI) ही एक स्वतंत्र, स्वयंसेवी, ना-नफा संस्था आहे. CHRI चे मुख्यालय नवी दिल्ली येथे असून लंडन, युनायटेड किंग्डम आणि अक्रा, घाना येथे कार्यालये आहेत. या संस्थेने १९८७ पासून राष्ट्रकुल देशांमधील मानवी हक्कांच्या प्रश्नांची वकिली करण्याबरोबरच त्याबाबत प्रबोधन आणि संघटनदेखील केले आहे. 'ॲक्सेस टू जस्टिस'(एटीजे) आणि 'ॲक्सेस टू इन्फर्मेशन' (एटीआय) या क्षेत्रांतील संस्थेची विशेषज्ञता सुपरिचित आहे. 'एटीजे' कार्यक्रमांतर्गत प्रामुख्याने पोलीस आणि तुरुंगातील सुधारणा केल्या गेल्या जातात. यात कर्तव्य बजावणाऱ्यांना जबाबदारी समजावण्यासह मनमानीला आळा घालणे, व्यवहारात पारदर्शकता आणणे या बाबी समाविष्ट आहेत. CHRI धोरणात्मक हस्तक्षेपासह कायदेशीर उपाययोजना, नागरी संस्थांची मोट बांधण्यासह भागीधारकांसोबतचे व्यवहार करते. आरटीआय विविध प्रदेशातील माहितीचा अधिकार (आरटीआय) आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या कायद्यांमध्ये लक्ष घालते. तसेच तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, आव्हानात्मक प्रश्नांना उजेडात आणणे, पारदर्शकता कायद्यांच्या व्यापक वापरासाठीची प्रक्रिया करण्याबरोबर विविध क्षमता विकसित करण्यासाठीही काम करते. कॉमनवेल्थ ह्युमन राईट्स इनिशिएटिव्ह माध्यमे आणि माध्यम हक्कांवर असलेल्या दबावांचा आढावा घेते. शिवाय, छोट्या राज्यांवर लक्ष केंद्रित करून नागरी समाजाचा आवाज यूएन मानवाधिकार परिषद आणि राष्ट्रकुल सचिवालयाच्या पटलावर आणण्याचा प्रयत्न केला जातो. एसडीजी ७.७ हे कॉमनवेल्थ ह्युमन राईट्स इनिशिएटिव्हच्या कामाचे एक नवे क्षेत्र आहे. गुलामीच्या वर्तमान स्वरूपाचा सामना करण्याच्या हेतूने या क्षेत्राची विविध भूप्रदेशातील वकिली, संशोधन आणि संघटन या क्षेत्रांत यांची उभारणी केली आहे.

CHRI ला यूएन आर्थिक आणि सामाजिक परिषदेसह राष्ट्रकुल सचिवालयाने सल्ला मसलत विषयक विशेष दर्जा दिला आहे. CHRI तिच्या तज्ज्ञतेसाठी सरकार, पर्यवेक्षण संस्था आणि नागरी समाजात ओळखली जाते.CHRI भारतात संस्थारूपात तर लंडनमध्ये मर्यादित धर्मादाय स्वरूपात आणि घानामध्ये स्वयंसेवी संस्था म्हणून नोंदणीकृत आहे.

'कॉमनवेल्थ ऑफ नेशन'च्या ५४ राष्ट्रांच्या संघटनेने सदस्यांना समान सामायिक कायद्याचा आधार दिल्याने सदस्य देशांमध्ये मानवी हक्कांच्या मुद्द्यांवर फारसे लक्ष दिले गेले नाही म्हणून १९८७ मध्ये काही तज्ज्ञ राष्ट्रकुल संघटनांनी CHRI ची स्थापना केली.

संशोधन, अहवाल, वकिली, गुंतवणूक, जमवाजमव आणि नियतकालिक तपासणीद्वारे CHRI मानवी अधिकारांच्या मुद्द्यांसंदर्भातील प्रगती आणि अडचणींकडे लक्ष वेधते. ही संस्था राष्ट्रकुल सचिवालय, संयुक्त राष्ट्र मानवी हक्क परिषदेचे सदस्य, माध्यमे आणि नागरी समाजाला संबोधित करते. त्या सोबतच लोकशिक्षणाचे उपक्रम, धोरणविषयक संवाद, तुलनात्मक संशोधन, माहिती आणि न्यायाची सर्वसामान्यांना उपलब्धता या मुद्द्यांवर कार्य करते.

CHRI मानवाधिकारांच्या सार्वत्रिक घोषणा, राष्ट्रकुल हरारे तत्त्वे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त मानवाधिकार साधने तसेच मानवी हक्कांना पाठिंबा देणारी देशी साधने यांचे पालन करण्याचा प्रयत्न करते.

**आंतरराष्ट्रीय सल्लागार आयोग :** ॲतलिसन डक्सबरी (अध्यक्ष)

**सदस्य :** वजाहत हबीबुल्ला, जोआना एवार्ट-जेम्स, एडवर्ड मॉर्टिमर, सॅम ओकुडजेटो आणि संजॉय हजारिका

**कार्यकारी समिती (भारत) :** वजाहत हबीबुल्ला (अध्यक्ष)

**सदस्य :** किशोर भार्गव, बी. के. चंद्रशेखर, जयंतो चौधरी, माजा दारूवाला, नितीन देसाई, कमल कुमार, मदन बी. लोकूर, पूनम मुत्रेजा, जेकब पुन्नूज, विनीता राय, ए. पी. शाह आणि संजॉय हजारिका

**कार्यकारी समिती (घाना) :** सॅम ओकुडझेटो (अध्यक्ष)

**सदस्य :** अकोटो अंपाव, वजाहत हबीबुल्ला, कोफी क्वाशीगाह, ज्युलिएट तुआकली आणि संजॉय हजारिका

**कार्यकारी समिती (यूके) :** जोआना एवर्ट-जेम्स (चेअरपर्सन)
**सदस्य :** रिचर्ड बॉर्नी, प्रलब बरुआ, टोनी फोरमन, नेव्हिल लिंटन, सुझान लेम्बर्ट आणि संजॉय हजारिका.

आंतरराष्ट्रीय संचालक संजॉय हजारिका

© कॉमनवेल्थ ह्युमन राईट्स इनिशिएटिव्ह, २०२०. मूळ स्रोताला योग्य ती पोचपावती देऊन या अहवालातील माहिती-मजकुराचा वापर करू शकता.

**CHRI मुख्यालय, नवी दिल्ली**
५५ ए, तिसरा मजला
सिद्धार्थ चेंबर्स,
कालू सराय,
नवी दिल्ली- १०० ०१६
भारत
दूरध्वनीः +९१
११४३१८०२००
फॅक्सः +९१ ११४३१८०२१७
ई-मेल :
infohumanrightsinitiative.org

**CHRI लंडन**
खोली क्र. २१९
स्कूल ऑफ डवान्स्ड स्टडीज,
साउथ ब्लॉक, सिनेट हाऊस,
मॅलेट स्ट्रीट, लंडन डब्ल्यूसी
१ इ ७ एचयू युनायटेड किंग्डम
ई-मेल :
londonhumanrightsinitiative.org

**CHRI अफ्रिका, अक्रा**
डॉ. स्टॅन्ले मार्बेल प्लाझा येथील
१५८/२ आश्रय खाली अक्रा.
दूरध्वनी/फॅक्स :
+२३३ ३०२ ९७११७०
ई-मेल :
chriafricahumanrightsinitiative.org

www.humanrightsinitiative.org

# असोसिएशन फॉर ॲडवोकसी अँड लीगल इनिशिएटिव्हज्

'असोसिएशन फॉर ॲडवोकसी अँड लीगल इनिशिएटिव्हज्' (AALI) ही एक स्त्री-नेतृत्व लाभलेली आणि स्त्री-संचालित मानवाधिकार संस्था आहे. ही संस्था थेट हस्तक्षेप, क्षमता बांधणी, संशोधन आणि वकिलीद्वारे स्त्रिया, मुले आणि इतर उपेक्षित समुदायांच्या मानवी हक्कांच्या संरक्षण आणि प्रगतीसाठी कटिबद्ध आहे. उत्तर प्रदेश, झारखंड आणि उत्तराखंडमध्ये कॉमनवेल्थ ह्युमन राईट्स इनिशिएटिव्ह प्रत्यक्ष फील्डवर काम करत असल्याने (AALI) भारतभरातील विविध मानवी हक्क संघटना आणि गटांना तांत्रिक साहाय्य करत असते.

१९८८मध्ये स्थापन झालेल्या (AALI)च्या वैचारिक चौकटीचा पाया हा 'युनायटेड नेशन्स कॉन्व्हेन्शन ऑन द इलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स ऑफ डिस्क्रिमिनेशन'वर (सीइडीएडब्ल्यू) आधारित आहे. (AALI) स्त्रियांना माणूस म्हणून समान असण्याची मान्यता देते. सोबतच ही संघटना भारतीय राज्यघटनेसह आंतरराष्ट्रीय मानवाधिकार करारांनी स्त्रियांना दिलेल्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्कांचे संरक्षण करणाऱ्या समानतावादी प्रणालीची कल्पना करते.

स्त्रीवादी दृष्टिकोन आणि मानवी हक्कांच्या दृष्टिकोनावर आधारित संघटनेचा असा विश्वास आहे की, कायदा हा एक बदल घडवणारा अवकाश आणि सामाजिक न्यायासाठीचे एक शक्तिशाली साधन आहे. म्हणूनच संस्था ते बहुआयामी धोरणात्मक चौकटीसह विविध मुद्द्यांचा पुरस्कार, न्याय आणि क्षमता निर्माणासाठी कार्यरत आहे.

आली
AALI

४०७, डॉ. बैजनाथ रोड,
न्यू हैदराबाद कॉलनी,
लखनऊ, उत्तर प्रदेश - २२६००७
दूरध्वनी : ०५२२-२७८२०६०
फॅक्स : ०५२२-२७८२०६
ई-मेल : aaliaalilegal.org

aaliaalilegal.org

# लैंगिक गुन्ह्यांची पोलीस नोंदणी

## लैंगिक गुन्ह्यांविषयीची
## प्रक्रिया आणि पोलिसांचे उत्तरदायित्व
### या विषयावरील मार्गदर्शिका


**संशोधन आणि लेखन**
अदिती दत्ता, अंकुर ओट्टो आणि देविका प्रसाद

**संपादन**
संजॉय हजारिका आणि शुभांगी सिंग मांडणी आणि

**अनुवाद**
शर्मिष्ठा भोसले

**रचना**
अनुजा खोखानी

## शब्दांची संक्षिप्त रूपे व त्याचे अर्थ

| | |
|---|---|
| **आयपीसी** | भारतीय दंड संहिता (इंडियन पिनल कोड) |
| **अ‍ॅट्रॉसिटी कायदा** | अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८९, सुधारित २०१५. |
| **पॉक्सो** | लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ (म्हणजेच प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्सेस अ‍ॅक्ट, २०१२) |
| **एसजेपीयू** | विशेष किशोर पोलिस कक्ष (स्पेशल ज्युव्हेनिल पोलिस युनिट) |
| **एनजीओ** | बिगरसरकारी संस्था (नॉनगर्व्हमेंट ऑर्गनायझेशन) |
| **एफआयआर** | प्रथम माहिती अहवाल (फर्स्ट इन्फॉर्मेशन रिपोर्ट) |
| **ओएससी** | वनस्टॉप क्रायसिस सेंटर |
| **यूटी** | केंद्रशासित प्रदेश (युनियन टेरिटरी) |
| **एससी/एसटी** | अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती |
| **सीआरपीसी** | फौजदारी प्रक्रियेची संहिता (कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर) |
| **पीएफओ** | पोलिस सुविधा अधिकारी (पोलिस फॅसिलिटेशन ऑफिसर) |
| **एसपी** | पोलिस अधीक्षक (सुप्रिटेन्डन्ट ऑफ पोलीस) |
| **डीसीपी** | पोलीस उपायुक्त |

# अनुक्रमणिका


प्रस्तावना ८

**भाग अ**

आपल्या कायद्यांमध्ये नोंदवलेली लैंगिक हिंसा आणि लैंगिक गुन्हे

१. लैंगिक हिंसा म्हणजे काय? १०
२. व्यापक रूपात लैंगिक हिंसेचे विविध प्रकार कोणते आहेत? १०
३. लैंगिक हिंसा हा गुन्हा आहे का? ११
४. लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी वेगळे कायदे आहेत का? १६
५. 'पॉस्को'अंतर्गत लैंगिक गुन्ह्यात पीडित आणि दोषी कोण आहे? २०
६. 'आयपीसी'अंतर्गत लैंगिक गुन्ह्यात पीडित आणि दोषी कोण असू शकतो? २०
७. लैंगिक गुन्हा घडल्याचे समजताच पोलीस कारवाई करू शकतात का? २०

**भाग ब**

लैंगिक गुन्ह्यांची नोंद करणे

८. लैंगिक गुन्हा पोलिसात कोण नोंदवू शकतो? २२
९. मुलांसोबत घडलेल्या लैंगिक गुन्ह्यांची नोंद करण्यासाठी काही वेगळ्या पद्धती आहेत काय? २२
१०. घटना घडल्यानंतर अत्याचारग्रस्त व्यक्तीने जर लगोलग लैंगिक गुन्ह्याचा अहवाल दिला नाही तर काय करावे? २२
११. अत्याचारग्रस्त व्यक्ती गुन्हा नोंदवण्यासाठी पोलिसांपर्यंत कसा पोहोचू शकतो? २३
१२. लैंगिक गुन्ह्याची नोंद करण्यासाठी असा अत्याचारग्रस्त व्यक्ती कोणत्या पोलीस ठाण्याकडे जाऊ शकतो? २५
१३. पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवताना अत्याचारग्रस्त व्यक्तीला लेखी तक्रार द्यावी लागते का? २६
१४. अत्याचारग्रस्त व्यक्ती पोलिसांना कळवण्यापूर्वी रुग्णालयात जाऊ शकतो? २७
१५. वन स्टॉप क्रायसिस सेंटर्स (ओएससी) काय आहेत आणि ते अत्याचारग्रस्त व्यक्तींना कशी मदत करू शकतात? २७
१६. अत्याचाराबाबत पोलिसांना कळवताना अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती (एससी/ एसटी) समुदायातील अत्याचारग्रस्त व्यक्तींनी काय लक्षात ठेवले पाहिजे? २८
१७. लैंगिक गुन्हा नोंदवण्याचा प्रयत्न करणाऱ्या मानसिक वा शारीरिकदृष्ट्या अपंग (तात्पुरते किंवा कायमस्वरूपी) लोकांना मदत करण्यासाठी पोलिसांना विशेष पावले उचलण्याची गरज आहे का? २८

**भाग क**

**एफआयआर(फर्स्ट इन्फर्मेशन रिपोर्ट) च्या रूपात तक्रारींची नोंदणी**

१८. एफआयआर काय आहे? ३०
१९. गुन्ह्याची तक्रार मिळाल्यानंतर पोलिसांकडे एफआयआर न नोंदवण्याचा पर्याय असू शकतो का? ३०
२०. लैंगिक गुन्ह्यांसाठी एफआयआर नोंदवण्यापूर्वी पोलीस प्राथमिक चौकशी करू शकतात का? ३१
२१. एफआयआरमध्ये नेमके काय असावे? ३१
२२. एफआयआर नोंदवण्यासाठी पोलिसांनी कुठली कार्यपद्धती अवलंबली पाहिजे? ३२
२३. पॉक्सो कायदा व नियमांतर्गत एफआयआर नोंदवतेवेळी काही अतिरिक्त कार्यपद्धती अवलंबाव्या लागतात का? ३४
२४. गुन्हा नोंदणीवेळी अत्याचारग्रस्त व्यक्तींना साहाय्यकाची मदत घेण्याचा हक्क आहे का? ३५
२५. गुन्हा नोंदणीवेळी अत्याचारग्रस्त व्यक्तींना वकील मिळवण्याचा हक्क आहे का? ३६
२६. पोलीस तुमची तक्रार चुकीची ठरवून नाकारू शकतात का? ३६
२७. पोलीस अत्याचारग्रस्ताला तक्रार मागे घेण्यास सांगू शकतात का? ३७
२८. पोलीस अत्याचारग्रस्ताला तक्रारीतील काही तथ्य बदलायला लावू शकतात का? ३७
२९. पोलीस तुम्हाला पोलीस स्टेशनमध्ये ताटकळत ठेऊ शकतात का? ३७
३०. पोलिसांनी कोऱ्या कागदावर सही करायला सांगितल्यास तुम्ही ती करावी का? ३८

**भाग ड**

**तक्रार नोंदवून न घेतली गेल्यास करावयाचे उपाय**

३१. पोलीस ठाण्यात पोलिसांनी एफआयआर नोंदवून घेतली नाही तर आपण काय करू शकता? ४०
३२. आपण इतर कोणत्याही अधिकाऱ्यांकडे तक्रार करू शकता का? ४१
३३. एसपी आणि दंडाधिकारी यांच्याकडे दाखल करण्याच्या तक्रारींमध्ये काय समाविष्ट केले पाहिजे? ४१
३४. एसपी/डीसीपी एफआयआर नोंदवण्याऐवजी चौकशीचे आदेश देऊ शकतात का? ४२
३५. तुम्ही एसपी/डीसीपीला तक्रार कशी पाठवाल? ४२
३६. तुम्ही क्षेत्र दंडाधिकाऱ्यांकडे कसे जाल? ४२
३७. दंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार पोलिसांनी कारवाई केली नाही तर दंडाधिकारी काय करू शकतात? ४२

**भाग ई**

**तक्रार नोंदवून न घेतल्याबद्दल पोलिसांना कसे जबाबदार धरावे**

३८. एफआयआरच्या रुपात तक्रार नोंदवण्यात पोलिसांना अपयश आले तर तुम्ही काही पावले उचलू शकता का? ४४
३९. कलम १६६ ए (V सी) आयपीसी काय सांगते? ४४
४०. 'पॉस्को' कायद्यातील कलम २१(१) काय म्हणते? ४५
४१. ॲट्रॉसिटी कायद्याच्या कलम ४ मध्ये काय सांगितले आहे? ४६
४२. पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी तक्रार दाखल करण्यासाठी तुम्ही कोणती पावले उचलू शकता? ४६
४३. पोलीस अधिकाऱ्यांविरूद्ध फौजदारी तक्रार नोंदवण्यातले धोके काय आहेत? ४७

**परिशिष्ट** ४८

# प्रस्तावना

ही मार्गदर्शिका लैंगिक हिंसाग्रस्त व्यक्ती आणि तिला कायदेशीर प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात मदत करणारी कुणीही व्यक्ती यांच्यासाठी खास बनवली गेली आहे. पहिल्या टप्प्यात घडलेला गुन्हा कळवणे आणि पोलिसांकडून त्याची नोंद करवून घेणे या बाबींचा यात समावेश होतो. अभ्यास आणि प्रत्यक्षातले अनुभव असे सांगतात की, अत्याचारग्रस्त व्यक्ती मानसिक आघात, भीती यामुळे किंवा आपण वाईट चालीचे ठरवले जाऊ, असा विचार करत लैंगिक हिंसेची तक्रार नोंदवायला उशीर करतात. त्यात पोलीसही पुन्हा अत्याचारग्रस्तांची तक्रार नोंदवून घेण्यास नकार देतात वा चालढकल करतात. त्यांच्याकडे येणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या सर्व घटनांची नोंद करणे कायद्यानुसार पोलिसांना बंधनकारक आहे. ते यासाठी नकार देतात तेव्हा ते अत्याचारग्रस्ताचा न्याय मिळवण्याचा हक्क, कायदा आणि त्यांचे कर्तव्य या तिन्ही बाबींचे उल्लंघन करतात. यामुळे संबंधित प्रकरणांमध्ये तडजोड होणे, प्रचंड उशीर होणे किंवा कायदेशीर प्रक्रिया सुरू होते न होते तोच हार वाट्याला येणे अशा गोष्टी घडतात.

कायम विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या (फ्रिक्वेन्टली आस्क्ड क्वेशन्स) रूपात सादर केलेली ही मार्गदर्शक पुस्तिका प्रौढ आणि बाल अत्याचारग्रस्तांना तक्रार नोंदवण्याबरोबरच नोंदणी प्रक्रियेबाबतचे मार्गदर्शन करते. त्यांच्या तक्रारी जर पहिल्यावेळी पोलीस ठाण्यात नाकारल्या गेल्या तर काय उपाययोजना करता येतील, याबाबतची माहिती यात दिली आहे. ठरावीक प्रकरणात तक्रार नोंदवण्यास पोलिसांनी टाळाटाळ केली किंवा नकार दिला तर त्यांना जबाबदार धरण्यासाठी कोणती पावले उचलली जाऊ शकतात, हे यामध्ये सांगितले आहे. सोबतच ही पुस्तिका संबंधित कायद्यांमधील लैंगिक गुन्हे म्हणून परिभाषित केलेल्या गुन्ह्यांवरदेखील ठळकपणे प्रकाश टाकते.

अत्याचारग्रस्तांसह त्यांना मदत करणाऱ्या व्यक्तींना स्वत:चे हक्क आणि एकूण कायदेशीर प्रक्रिया माहीत असणे आवश्यक आहे. जेणेकरून, कोणताही पोलीस अधिकारी त्याच्या पदाचा अयोग्य वापर करून वर पुन्हा घडलेल्या गैरकारभारावर पांघरूण घालू शकणार नाही. मात्र हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा आपण चुकीच्या आणि बेकायदेशीर कृतीविरोधात आत्मविश्वासाने बोलू शकू. ही मार्गदर्शक पुस्तिका तयार करताना हीच आशा वाटते की, अत्याचारग्रस्तांसह त्यांना मदत करणार्यांना हे वाचून नेमकी कार्यपद्धती आणि स्वत:चे हक्क याबद्दल स्पष्टता येईल. तसेच या पुस्तिकेचा न्याय मिळवण्यासोबतच स्वत:च्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठीही उपयोग होईल.

भाग अ

# आपल्या कायद्यांमध्ये नोंदवलेली लैंगिक हिंसा आणि लैंगिक गुन्हे

# १. लैंगिक हिंसा म्हणजे काय?

लैंगिक हिंसा ही मानवी हक्कांची गंभीर पायमल्ली आहे. लैंगिक हिंसेची रूपेही बरीच आहेत. लैंगिक हिंसा कधी होते? जेव्हा एखादी व्यक्ती कोण्या दुसऱ्या व्यक्तीला सहमती आणि संमतीशिवाय नकोशा लैंगिक क्रियेत सक्तीने सहभागी घ्यायला लावते किंवा दुखापत करते. लैंगिक हिंसेचा परिणाम सर्व वयोगट आणि लिंगाच्या आणि लोकांवर सारखाच होतो.

मित्र, कुटुंबातील सदस्य, प्रियकर किंवा प्रेयसी, कामातले सहकारी, इतर विश्वासार्ह व्यक्ती, अधिकारपदावर असणारी व्यक्ती किंवा अनोळखी व्यक्तीही लैंगिक अत्याचार करू शकतात. पीडित व्यक्तीला व तिच्या कुटुंबाला धमकावणे, त्यांच्या प्रतिष्ठेला बाधा आणण्याची धमकी देणे, पीडिताला संकोच/लज्जा वाटेल असे बोलणे किंवा पीडित व्यक्तीच अडचणीत येईल अशी धारणा भवतालात तयार करणे, कधीकधी असंही होऊ शकते की, दोन किंवा अधिक गैरवर्तन करणारे लोक पीडित व्यक्तीला लैंगिक इजा पोहोचवण्यासाठी एकत्र येऊ शकतात.

> **लैंगिक हिंसेची व्याख्या करताना 'जागतिक आरोग्य संघटना' म्हणते की, पीडित व्यक्तीच्या नात्यात असलेल्या वा नसलेल्या कुठल्याही व्यक्तीने केलेली लैंगिक कृती, लैंगिक गोष्टी मिळवण्याचा प्रयत्न, नकोशा लैंगिक टिपण्या किंवा लगट करण्याचे प्रयत्न, एखाद्या व्यक्तीच्या लैंगिकतेचा व्यापार करण्याचे प्रयत्न किंवा जबरदस्ती, इजा करण्याची धमकी किंवा शारीरिक बळजबरी या अशा गोष्टी घर, कार्यालयीन परिसरात किंवा त्याबाहेर कुठेही घडू शकतात.**

लैंगिक हिंसा कोणत्याही ठिकाणी घडू शकते म्हणजे कुटुंबात, वैवाहिक नात्यात किंवा एखाद्या जिव्हाळ्याच्या नातेसंबंधात, एखाद्या लोकसमूहात, नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी, शाळेत, सार्वजनिक ठिकाणी किंवा अगदी रस्त्यावरही घडू शकते. अशी हिंसा युद्ध किंवा संघर्षाच्या वेळीदेखील होते. जेव्हा केव्हाही आणि जिथे कुठेही असा प्रकार घडतो तेव्हा तो पीडितासाठी मानसिक, शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या खिळखिळा करणारा वेदनादायक अनुभव असतो.

**लैंगिक हिंसाचारात पीडित व्यक्तीचा दोष कधीच नसतो.**

# २. व्यापकपणे पाहता लैंगिक हिंसाचाराचे विविध प्रकार कोणते आहेत?

लैंगिक हिंसा हा प्रवेधक (penetrative) किंवा अ-प्रवेधक (non-penetrative) प्रकारचा लैंगिक अत्याचार असू शकतो. प्रवेधक प्रकारचा लैंगिक अत्याचार म्हणजे अत्याचार करणारा बळाचा वापर करत पीडित व्यक्तीची योनी किंवा गुदद्वार, तोंड किंवा शरीराच्या कोणत्याही अवयवात आपल्या शरीरातील कोणत्याही भागाच्या माध्यमातून लैंगिक अवयवाद्वारे किंवा वस्तूद्वारे, पीडित व्यक्तीच्या इच्छेविरुद्ध पूर्णत: किंवा थोडाबहुत आत शिरतो.
'बलात्कार' हा सहसा प्रवेधक प्रकारच्या लैंगिक अत्याचाराला गुन्हा ठरवणारा कायदेशीर शब्द म्हणून वापरला जातो.

**अ-प्रवेधक प्रकारचे लैंगिक अत्याचार खालीलप्रमाणे असू शकतात.**

- नकोशी लैंगिक जवळीक किंवा स्पर्श करणे.
- एखाद्याची गुप्तांगे किंवा नग्न शरीर इतरांना त्यांच्या संमतीविना दाखवणे.
- सार्वजनिक ठिकाणी हस्तमैथुन करणे.
- एखाद्याला आपले कपडे काढायला भाग पाडणे.
- एखाद्याच्या हालचालींवर नजर ठेवणे किंवा नकोसा संबंध प्रस्थापित करण्याच्या हेतूने प्रत्यक्ष शारीरिक वा अप्रत्यक्ष ऑनलाईन जगात पाठलाग करणे.
- एखाद्याच्या खासगी कृतीतून त्याला समजू न देता किंवा परवानगीशिवाय त्याची छायाचित्रे/ व्हिडिओ काढणे किंवा पाहणे.
- एखाद्याला नकोशा लैंगिक इच्छेसाठी विचारणे किंवा अभद्र लैंगिक टिपण्या करणे.

## ३. लैंगिक हिंसाचार हा गुन्हा आहे का?

**होय, लैंगिक हिंसाचाराचे बरेच प्रकार भारतात गुन्हा मानले गेलेत. याचा अर्थ असा की, गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला न्यायालयाने दोषी ठरवले तर तिला शिक्षा होऊ शकते आणि ती व्यक्ती तुरुंगात जाऊ शकते.**

भारतीय दंड संहिता (आयपीसी) लैंगिक हिंसाचाराच्या बर्यानच कृतींना गुन्ह्याच्या रूपात परिभाषित करते. प्रत्येक गुन्ह्याला वेगळे नाव देते तसेच एखाद्या कृतीला गुन्हा ठरवून त्याची शिक्षा देते.

लक्षात असू द्या की, दोन प्रौढ व्यक्तींनी परस्पर सहमतीने ठेवलेले लैंगिक संबंध कधीही गुन्हा ठरत नाहीत.

२०१३ पूर्वी 'आयपीसी'मध्ये केवळ दोन लैंगिक गुन्हे होते. कलम ३७६ अन्वये, बलात्काराच्या मर्यादित व्याख्या करत त्या-नुसार शिक्षा आणि कलम ३५४ अन्वये, एखाद्या महिलेचा विनयभंग करणे यासाठी शिक्षा दिली जायची. जी फक्त साध्यासुध्या छेडछाडीच्या घटनांनाच लागू होती. ज्यात नकोसा लैंगिक स्पर्श करणे किंवा लगट करणे या गोष्टींचा समावेश होता. २०१३ सालापर्यंत लैंगिक हिंसाचाराचे अनेक प्रकार या कायद्यातून पूर्णतः हरवले होते. याचाच अर्थ हे प्रकार अनुभवलेले अत्याचारग्रस्त लोक त्याबाबत पोलिसांना कळवू शकले नाहीत.

२०१३ मध्ये अधिकाधिक लैंगिक गुन्ह्यांच्या व्याख्या करण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. २०१३ च्या दुरुस्ती कायद्याने बलात्काराच्या व्याख्येचा विस्तार केला आणि लैंगिक छळ, जबरदस्तीने विवस्त्र करणे, एखाद्याची लैंगिक कृती चोरून पाहणे आणि पाठलाग करणे अशा कृत्यांनाही इतर लैंगिक गुन्ह्यांच्या रांगेत आणले गेले.

खालील तक्ता २०१३ मध्ये आयपीसीमध्ये समाविष्ट आणि परिभाषित केल्या गेलेल्या लैंगिक गुन्ह्यांची आणि त्यांच्यासाठी होणार्या शिक्षेचा आवाका स्पष्ट करतो.

## भारतीय दंड संहितेमधील गुन्हे आणि त्यासाठी नमूद केलेल्या शिक्षा

| कलमे | गुन्हे | शिक्षा | |
|---|---|---|---|
| | | कमाल | किमान |
| ३५४ | स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने केलेला हल्ला किंवा फौजदारी पात्र बलप्रयोग करणे | ५ वर्षांचा कारावास आणि दंड | १ वर्षाचा कारावास आणि दंड |
| ३५४ अ | अस्वागतार्ह शारीरिक संबंध आणि लैंगिक लगट करण्याचे प्रयत्न किंवा मागणी, अश्लील साहित्य दाखवणे या स्वरूपातील लैंगिक छळ<br>लैंगिक छटा असलेली शेरेबाजी या स्वरूपातील लैंगिक छळ | ३ वर्षांचा कारावास किंवा दंड किंवा दोन्ही | १ वर्षाचा कारावास किंवा दंड किंवा दोन्ही |
| ३५२ ब | विवस्त्र करण्याच्या उद्देशाने स्त्रीवर केलेला हल्ला किंवा गुन्हेगारी शक्तीचा वापर | ७ वर्षांचा कारावास आणि दंड | ३ वर्षांचा कारावास आणि दंड |
| ३५४ क | व्होयुरिझम<br>खासगी गोष्टी करणाऱ्या कोणत्याही स्त्रीच्या नकळत तिला पाहणारा किंवा तिचे फोटो काढणारा असे फोटो प्रसारित करणारा कोणताही पुरुष<br>त्यानंतर लगेचच केलेला कोणताही गुन्हा | ३ वर्षे कारावास आणि दंड<br>७ वर्षांचा कारावास आणि दंड | १ वर्ष कारावास आणि दंड<br>३ वर्षांचा कारावास आणि दंड |
| ३५४क | व्होयुरिझम<br>खासगी गोष्टी करणाऱ्या कोणत्याही स्त्रीच्या नकळत तिला पाहणारा किंवा तिचे फोटो काढणारा असे फोटो प्रसारित करणारा कोणताही पुरुष<br>त्यानंतर लगेचच केलेला कोणताही गुन्हा | ३ वर्षे कारावास आणि दंड<br>७ वर्षांचा कारावास आणि दंड | ३ वर्षांचा कारावास आणि दंड<br>३ वर्षांचा कारावास आणि दंड |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५४ड | पाठलाग<br>स्त्रीने नकार दर्शवल्यानंतरही तिचा पाठलाग करणारा किंवा तिच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न करणारा कोणताही पुरुष (सिद्ध करता आले तर काही गोष्टींना पाठलाग म्हणता येणार नाही असा अपवाद कायद्याने दिलेला आहे.)<br>त्यानंतर लगेचच केलेला कोणताही गुन्हा | ३ वर्षे कारावास आणि दंड<br><br>५ वर्षे कारावास आणि दंड | |
| ३७०अ | तस्करी झालेल्या बालकाचे शोषण | ७ वर्षांचा कारावास आणि दंड<br>५ वर्षांचा कारावास आणि दंड | ५ वर्षांचा कारावास आणि दंड<br>३ वर्षांचा कारावास आणि दंड |
| ३७५ | बलात्कार<br>स्त्रीची इच्छा असताना किंवा नसताना काही विशिष्ट परिस्थितीत लिंग, शरीराचा कोणताही अवयव किंवा एखाद्या वस्तूचा स्त्रीच्या योनीत, तोंडात, मूत्रमार्गात किंवा गुदद्वारात प्रवेश करणे किंवा स्वतःचे तोंड लावणे किंवा तसेच इतर कोणत्याही व्यक्तीसोबत करण्यास तिला भाग पाडणे | आजीवन कारावास आणि दंड<br><br>आजीवन कारावास (व्यक्ती-ला नैसर्गिक मृत्यू येत नाही तोपर्यंत) | ७ वर्षांचा कारावास आणि दंड |
| ३७६ | पोलिस अधिकारी; किंवा सार्वजनिक नोकर; किंवा सशस्त्र सेनेचा सदस्य किंवा जेलमधील व्यवस्थापक किंवा कर्मचारी, सुधार गृह किंवा अटकेची इतर कोणतीही जागा किंवा स्त्रियांची किंवा बालकांची संस्था; किंवा हॉस्पिटलच्या व्यवस्थापनावर असणारा व्यक्ती किंवा हॉस्पिटलचा कर्मचारी; किंवा नातेवाईक, मार्गदर्शक, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्ती किंवा स्त्रीचा अधिकारी; किंवा सामाजिक हिंसाचारात<br>बलात्कार करणाऱ्या व्यक्तीकडून गरोदर | आजीवन कारावास (व्यक्ती-ला नैसर्गिक मृत्यू येत नाही तोपर्यंत) | १० वर्षांचा कारावास आणि दंड |

| | | | |
|---|---|---|---|
| | महिलेवर; १६ वर्षांच्या आतील मुलीवर; सहमती देण्यास असमर्थ असणाऱ्या स्त्रीवर; शारीरिक किंवा मानसिक अपंगत्व असणाऱ्या स्त्रीवर बलात्कार करताना ती गंभीर जखमी होणे, शरीराचा अवयव कायमचा गमावणे किंवा महिलेच्या जीवाला धोका निर्माण होणे किंवा सतत एकाच स्त्रीवर बलात्कार करणे | | |
| ३७६अ | जखमांमुळे महिलेचा जीव घेणारा किंवा आयुष्यभरासाठी कोमा अवस्थेत ढकलणारा बलात्कार | आजीवन कारावास (व्यक्तीच्या नैसर्गिक मृत्यूपर्यंत) किंवा मृत्यू | २० वर्षांचा कारावास |
| ३७६ब | वेगळे होण्याच्या काळात पत्नीच्या सहमतीशिवाय पतीने केलेला लैंगिक संबंध | ७ वर्षांचा कारावास आणि दंड | २ वर्षांचा कारावास आणि दंड |
| ३७६क | अधिकारी पदावर असलेल्या व्यक्तीकडून केला गेलेला लैंगिक संबंध | १० वर्षांचा कारावास आणि दंड | ५ वर्षांचा कारावास आणि दंड |
| ३७६ड | सामूहिक बलात्कार सारख्या उद्देशाने एक किंवा जास्त व्यक्तींनी महिलेवर केलेला बलात्कार | आजीवन कारावास (व्यक्तीच्या नैसर्गिक मृत्यूपर्यंत) आणि पीडितेला दंड देणे | २० वर्षांचा कारावास आणि पीडितेला दंड देणे |
| ३७६ई | पुन्हा तोच गुन्हा करणे (३७६, ३७६अ आणि ३७६ड मध्ये नमूद केलेला) | आजीवन कारावास (व्यक्तीच्या नैसर्गिक मृत्यूपर्यंत) किंवा मृत्यू | |
| ५०९ | महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने उच्चारलेला शब्द, केलेले हावभाव किंवा कृती | ३ वर्षांचा कारावास आणि दंड | |

भारतातील इतर कायदेही पीडित/अत्याचारातून सावरलेल्या व्यक्तीचे संरक्षण करतात आणि लैंगिक हिंसाचाराची विविध रूपे अनुभवलेल्यांना सुटकेचे मार्ग दाखवतात. जसे की, महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५, आणि कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि तक्रारनिवारण) अधिनियम, २०१३ तसेच पीडित व्यक्तीला नुकसान भरपाई योजना हे असे कायदे पीडित/अत्याचारातून सावरलेल्या व्यक्तीचे संरक्षण करतात.

अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, १९८९ (अत्याचार प्रतिबंधक कायदा) अंतर्गत अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या महिलांबाबत घडलेले लैंगिक गुन्हे किंवा अत्याचार यांचादेखील लैंगिक गुन्ह्यांमध्ये समावेश होतो.

## अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा या अंतर्गत नमूद केलेले महिलांविरोधातील विशेष गुन्हे आणि त्यासाठीच्या शिक्षा

| कलमे | गुन्हे | शिक्षा | |
|---|---|---|---|
| | | कमाल | किमान |
| ३ (१) (क) | अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीतील स्त्रीला कोणत्याही धार्मिक संस्थेस दान करून देवदासी परंपरा पाळणे किंवा त्यास प्राधान्य देणे. | ६ महिन्यांचा कारावास | ५ वर्षांचा कारावास |
| ३ (१) (व i) | अनुसूचित जात किंवा अनुसूचित जमातीतल्या स्त्रीची परवागनी नसताना तिला मुद्दाम स्पर्श करणे. | ६ महिन्यांचा कारावास | ५ वर्षांचा कारावास |
| ३ (१) (व ii) | अनुसूचित जात किंवा अनुसूचित जमातीतल्या महिलेला उद्देशून लैंगिक स्वरूपाच्या शब्दांचा किंवा हावभावांचा वापर करणे | ६ महिन्यांचा कारावास | ५ वर्षांचा कारावास |

**टीप :** ॲट्रॉसिटी कायद्यात अशी तरतूद आहे की, एखाद्या व्यक्तीला भारतीय दंड विधानानुसारही शिक्षा होऊ शकते. एखाद्या व्यक्तीने अनुसूचित जाती किंवा जमातीच्या व्यक्तीवर अत्याचार केला असेल तर त्या दोषी व्यक्तीच्या दहा वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कारावासाची शिक्षा किंवा जन्मठेप अशा शिक्षांमध्ये आयपीसीअंतर्गत वाढ होते. असे असले तरी, ॲट्रॉसिटी कायद्याच्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे शिक्षेत वाढ करणे बहुतेक लैंगिक गुन्ह्यांत लागू होत नाही.

## ४. लैंगिक गुन्ह्यांपासून लहान मुलांचे संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र कायदे आहेत का व कोणते?

**होय. लैंगिक हिंसेला बळी पडलेल्या प्रौढांपेक्षा लहान मुलांच्या गरजा आणि परिस्थिती भिन्न असू शकते म्हणूनच लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ म्हणजेच 'पॉक्सो' नावाचा स्वतंत्र कायदा १४ नोव्हेंबर २०१२ रोजी अधिनियमित करण्यात आला. १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या बालकांना लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण देणे, त्यांच्यावर झालेल्या लैंगिक गुन्ह्यांना शिक्षा देणे आणि बालकांचे सर्वोत्तम हित लक्षात घेण्यासाठीच्या पद्धती अवलंबणे यासाठीचा हा एक विशेष कायदा आहे. हा कायदा असेही सांगतो की, लैंगिक कृतीसाठी सहमती नोंदवण्याचे वय १८ वर्षे आहे. थोडक्यात, १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या बालकाने लैंगिक संबंध किंवा कोणतीही लैंगिक क्रिया करण्याचे ठरवले तरीही वयामुळे कायदा यास सहमती दर्शवत नाही.**

हा तक्ता 'पॉक्सो'मध्ये परिभाषित केलेल्या बालकांवर केल्या जाणाऱ्या लैंगिक गुन्ह्यांची व्याप्ती आणि त्यांच्या शिक्षेचे वर्णन करतो.

### अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा<br>या अंतर्गत नमूद केलेले महिलांविरोधातील विशेष गुन्हे आणि त्यासाठीच्या शिक्षा

| कलमे | गुन्हे आणि त्याचे विश्लेषण | शिक्षा | |
|---|---|---|---|
| | | कमाल | किमान |
| **कलम ३** | छेदणारा (लिंग प्रवेशाचा) लैंगिक आघात<br>मुलाच्या खासगी भागात शरीराचा अवयव किंवा वस्तू घुसवणे; किंवा त्याला तसे इतरांबाबत करण्यास भाग पाडणे; किंवा त्याच्या खासगी अवयांवर तोंडाचा वापर करणे (मुलाचे लिंग, योनी, मूत्रमार्ग किंवा गुदद्वार) किंवा मुलाला तसे करण्यास भाग पाडणे. | **कलम ४ (१)**<br>कमाल : आजीवन कारावास आणि दंड | किमान : १० वर्षांचा कारावास आणि दंड |
| | | **कलम ४ (२)**<br>१६ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलासाठी<br>किमान : व्यक्तीचा नैसर्गिक मृत्यू येईपर्यंत कारावास आणि दंड | किमान : २० वर्षांचा कारावास आणि दंड |

## कलम ४ (३)

उप विभाग (१) अंतर्गत घेतला जाणारा दंड हा न्याय्य आणि वाजवी असावा आणि वैद्यकीएय खर्चासाठी आणि पुर्नवसनासाठी पीडिताला देण्यात यावा

## कलम ५

गंभीर स्वरूपाचा छेदणारा (लिंग प्रवेशाचा) लैंगिक आघात

पोलिस अधिकारी, सशस्त्र सेनेचा सदस्य, सार्वजनिक नोकर, कर्मचारी आणि सुधारगृह, तुरुंग, हॉस्पिटल, शाळा येथे झालेला लिंग प्रवेशात्मक लैंगिक आघात. यात कोणत्याही माणसाने किंवा समूहाने केलेला लिंग प्रवेश, आग, गरम वस्तू किंवा गंजलेल्या वस्तूसारखे प्राणघातक शस्त्र वापरून केलेला लिंग प्रवेशात्मक आघात, मुलाला कायमचे अधू करणारा किंवा त्याच्या क्षमतांवर कायमचा परिणाम करणारा किंवा त्याला मानिकदृष्ट्या आजारी पाडणारा, मुलाला काही काळ किंवा कायमचे नेहमीच्या कृती करण्यास असमर्थ करणारा लिंग प्रवेशात्मक लैंगिक आघात, मुलीला गरोदर करणारा, मुलाला एचआयव्ही किंवा इतर जीवघेण्या आजारांचा संसर्ग देणारा, एकापेक्षा जास्तवेळा केलेला लिंग प्रवेशात्मक लैंगिक आघात, १२ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलावर नातेवाईक, मालक किंवा व्यवस्थापक किंवा कर्मचारी किंवा बालकांना सेवा पुरवणाऱ्या कोणत्याही संस्थेतले कर्मचारी, विश्वासू व्यक्ती किंवा पदाधिकारी असणारी कोणत्याही व्यक्तीने केलेला लैंगिक आघात, बालिका गरोदर आहे हे माहीत असताना केलेला लैंगिक आघात, बालकाचा जीव घेण्याचा प्रयत्न, पूर्वी लैंगिक गुन्हा सिद्ध झालेल्या माणसाकडून, सामाजित हिंसाचाराच्या घटनांमध्ये झालेला लिंग प्रवेशात्मक लैंगिक आघात आणि सार्वजनिक ठिकाणी बालकाला विवस्त्र करणे किंवा नग्न धिंड काढणे.

## कलम ६ (१)

कमाल : व्यक्तीच्या नैसर्गिक मृत्यूपर्यंत आजीवन कारावास आणि दंड, किंवा मृत्यू

किमान : २० वर्षांचा कारावास आणि दंड

## कलम ६ (२)

उप विभाग (१) अंतर्गत घेतला जाणारा दंड हा न्याय्य आणि वाजवी असावा आणि वैद्यकीय खर्चासाठी आणि पुर्नवसनासाठी पीडिताला देण्यात यावा

## कलम ७

लैंगिक आघात

लैंगिक उद्देशाने बालकाच्या खासगी अवयवांना (योनी, लिंग, गुदद्वार किंवा स्तन) स्पर्श करणे किंवा बालकाला त्या किंवा इतर व्यक्तीच्या खासगी अवयवांना स्पर्श करायला भाग पाडणे किंवा लिंग प्रवेश न करता लैंगिक इच्छेने बालकासोबत केलेला कोण-ताही शारीरिक संबंध

## कलम ८

कमाल : ५ वर्षांचा कारावास आणि दंड

किमान : ३ वर्षांचा कारावास आणि दंड

---

## कलम ९

गंभीर लैंगिक आघात

पोलिस अधिकारी किंवा सशस्त्र सेनेचा सदस्य, सार्वजनिक नोकर, सुधारगृह, तुरुंग, हॉस्पिटल, शाळा यादीचा कर्मचारी यांनी केलेला लैंगिक आघात आणि कलम ५ च्या दुसऱ्या भागात नमूद केलेल्या लैंगिक आघातांपैकी मुलीला गरोदर करण्याचा अपवाद वगळल्यास इतर सर्व लैंगिक आघात

## कलम १०

कमाल : ७ वर्षांचा कारावास आणि दंड

किमान : ५ वर्षांचा कारावास आणि दंड

---

## कलम ११

लैंगिक छळ

लैंगिक उद्देशाने केलेला :

(i) कोणताही शब्द उच्चारणे किंवा कोणताही आवाज काढणे किंवा कोणत्याही प्रकारचे हावभाव करणे किंवा एखादी वस्तू किंवा शरीराचा भाग शब्द ऐकू येईल किंवा हावभाव दिसतील अशा पद्धतीने प्रदर्शित करणे; किंवा

(ii) अशा किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला दिसेल अशा पद्धतीने बालकाला त्याचे शरीर किंवा कोणताही अवयव प्रदर्शित करण्यास लावणे; किंवा

(iii) अश्लील साहित्याच्या उद्देशाने बालकाला कोणत्याही प्रकारची वस्तू दाखवणे; किंवा

(iv) थेटपणे किंवा इलेक्ट्रॉनिक, डिजिटल किंवा इतर कोणत्याही माध्यमातून एखाद्या बालकाचा सतत पाठलाग करणे किंवा टक लावून बघणे किंवा संपर्क करण्याचा प्रयत्न करणे; किंवा

## कलम १२

कमाल : ३ वर्षांचा कारावास आणि दंड

(iv) थेटपणे किंवा इलेक्ट्रॉनिक, डिजिटल किंवा इतर कोणत्याही माध्यमातून एखाद्या बालकाचा सतत पाठलाग करणे किंवा टक लावून बघणे किंवा संपर्क करण्याचा प्रयत्न करणे; किंवा

(v) अश्लील साहित्य बनवण्यासाठी बालकाला फूस लावणे

## इतर गुन्हे

| कलमे | गुन्हे | शिक्षा | |
|---|---|---|---|
| | | कमाल | किमान |

**कलम १३**

अश्लील साहित्य बनवण्यासाठी बालकाचा वापर

बालकाचा कोणत्याही माध्यमात (खासगी उद्देशासाठी किंवा सार्वजनिक प्रसारणासाठी बनवलेले कार्यक्रम किंवा जाहिराती समावेत), लैंगिक सुखासाठी, कोणाकडूनही, झालेला वापर. त्यात या गोष्टींचा समावेश होतो

(i) बालकाच्या लैंगिक अवयवांचे प्रदर्शन;

(ii) नैसर्गिकरित्या लैंगिक कृती करणाऱ्या किंवा त्या करण्यास भाग पाडलेल्या बालकाचा वापर (लिंग प्रवेश असलेल्या किंवा नसलेल्या);

(iii) बालकाचे अशोभनीय किंवा अश्लील चित्रण

**कलम १४ (१)**

गुन्हाची पहिली वेळ
किमान : ५ वर्ष आणि दंड

पुन्हा तोच गुन्हा केल्यास :
किमान : ७ वर्ष आणि दंड

(२) उपविभाग (१) मध्ये दिलेल्या कलमांनुसार कोणीही बालकाचा अश्लील साहित्य बनवण्याच्या उद्देशाने वापर करत असल्यास त्यात थेटपणे सहभागी होणारी व्यक्ती कलम ३ किंवा कलम ५ किंवा कलम ७ किंवा कलम ९ अंतर्गत गुन्हेगार ठरेल, या गुन्हासाठी त्या व्यक्तीला उपविभाग (१) मध्ये नमूद केलेल्या शिक्षेसोबतच कलम ४, कलम ६, कलम ८ आणि कलम १० अंतर्गत शिक्षा देण्यात यावी.

**कलम १५**

बालकाचा वापर असलेल्या अश्लील साहित्याची साठवणूक

(१) बालकाचा समावेश असलेल्या कोणत्याही माध्यमातल्या अश्लील साहित्याचा कोणत्याही माणसाकडे साठा असेल किंवा मालकी असणे, ते साहित्य नष्ट करण्यास अपयशी ठरणे किंवा संबंधित अधिकाऱ्याकडे अश्लील साहित्याचा प्रसार करण्याच्या उद्देशाने देणे

बालकाचा समावेश असणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या अश्लील साहित्याची साठवणूक किंवा

**कलम १५ (१)**

कमाल : गुन्ह्याची पहिली वेळ ५ हजार रुपये दंड

किमान : पुन्हा तोच गुन्हा केल्यास : १० हजार रुपये दंड

**कलम १५ (२)**

३ वर्षांचा कारावास किंवा दंड किंवा दोन्ही

मालकी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही पद्धतीने गुन्हा नोंदवतानाचा किंवा कोर्टात पुरावा म्हणून सादर करतानाचा अपवाद वगळता कोणत्याही वेळी केलेला प्रसार किंवा प्रचार किंवा प्रदर्शन किंवा वाटप

(३) बालकाचा समावेश असणाऱ्या अश्लील साहित्याचे व्यावसायिक दृष्टिकोनातून कोणत्याही व्यक्तीकडून केलेली साठवणूक किंवा मालकी

**कलम १५ (३)**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची पहिली वेळ | |
| कमाल : ५ वर्षांचा कारावास किंवा दंड किंवा दोन्ही | कमाल : ७ वर्षांचा कारावास किंवा दंड |
| दुसऱ्यांदा किंवा पुन्हा तोच गुन्हा करणे | किमान : ५ वर्षांचा कारावास किंवा दंड |

---

*टीप : 'पॉक्सो' कायद्याच्या कलम ४२ नुसार कलम १६६ अ, ३५४ अ ते ड, ३७०, ३७० अ, ३७५, ३७६, ३७६ अ, ३७६ क ते ई आणि आयपीसीच्या ५०९ नुसार लैंगिक हिंसा दंडनीय आहे अशा गुन्ह्यांसाठी दोषी आढळल्यास गुन्हेगारास 'पॉक्सो' किंवा 'आयपीसी'अंतर्गत शिक्षा दिली जाते.*

## ५. आयपीसी अंतर्गत लैंगिक गुन्ह्यांत पीडित आणि दोषी कोण असू शकतो?

बहुतेक लैंगिक गुन्हे हे लिंगविशिष्ट आहेत म्हणूनच ते फक्त महिलांना पीडित म्हणून तर पुरुषांना दोषी या रूपात पाहतात. परंतु काही गुन्हे लैंगिक तटस्थ आहेत; उदाहरणार्थ, मानवी तस्करी आणि ॲसिड हल्ल्याचे गुन्हे. एखादा गुन्हा लिंग तटस्थ असतो तेव्हा कोणीही म्हणजे  एक पुरुष किंवा एक महिला पीडित किंवा गुन्हेगार असू शकते.

## ६. 'पॉक्सो'अंतर्गत लैंगिक गुन्ह्यांतील पीडित आणि दोषी कोण आहे?

'पॉक्सो'अंतर्गत केवळ एक बालक पीडित आणि प्रौढ दोषी असू शकतो. हे देखील लिंग तटस्थ आहे. मुली आणि मुले दोघेही याला बळी पडू शकतात तर पुरुष आणि स्त्रिया दोघेही दोषी असू शकतात.

## ७. लैंगिक गुन्हा घडल्याचे समजताच पोलीस कारवाई करू शकतात का?

होय, आयपीसी आणि 'पॉक्सो' या दोन्ही कायद्यांतर्गत पोलीस कारवाई करू शकतात. लैंगिक गुन्हे हे दखलपात्र गुन्हे आहेत. त्यांना गंभीर गुन्हे म्हणून वर्गीकृत केले गेले आहे. जे पोलिसांना त्वरित कारवाई करण्यास परवानगी देतात. स्थानिक न्यायाधीशांकडून परवानगी न घेता पण या संदर्भात पोलीस गुन्हा नोंदवू शकतात व तपास सुरू करू शकतात. तसेच, वॉरंटशिवाय अटकही करू शकतात.

भाग ब

# लैंगिक गुन्ह्यांची नोंद करणे

## ८. लैंगिक गुन्हा पोलिसांना कोण कळवू शकतो?

पोलिसात गुन्हा नोंदवण्यासाठी आपण लैंगिक गुन्हा घडताना पाहिलेला असायलाच हवा असे नाही किंवा त्या गुन्ह्यातील पीडित तुम्हीच असायला हवे असे नाही. जो कोणी या गुन्ह्याबाबात कळवतो आहे, त्याने प्रामाणिक माहिती दिली पाहिजे आणि कोणतेही खोटे दावा करू नयेत. शक्य असेल तर अशी शिफारस केली जाते की, पीडितानेच पोलिसात झालेला गुन्हा कळवावा.

> **लैंगिक गुन्हा घडल्याची माहिती असलेली कोणतीही व्यक्ती पोलिसांकडे जाऊन कळवू शकते. यात कोणत्याही वयाचा पीडित, गुन्ह्याचा साक्षीदार किंवा लैंगिक गुन्हा घडला असावा अशी काही खात्रीलायक माहिती असलेल्या इतर कोणाचाही समावेश होतो.**

## ९. बालकांबाबत घडलेल्या लैंगिक गुन्हा पोलिसांना कळवण्यासाठी स्वतंत्र कार्यपद्धती आहेत का?

होय. बालकाबाबत घडलेल्या प्रत्येक लैंगिक गुन्ह्याची नोंद झाली आहे, हे सुनिश्चित करण्यासाठी 'पॉक्सो' कायद्यांतर्गत बालहक्कांच्या दृष्टिकोनातून विशेष कार्यपद्धती आहेत.

कायद्याच्या कलम १९ अन्वये, कोणतीही व्यक्ती (एखादे मूल वगळता) ज्याला एकतर मुलाविरुद्ध लैंगिक गुन्हा घडू शकणार असल्याची किंवा एखादा गुन्हा घडल्याची माहिती आहे, त्याने ती बाब स्पेशल जुवेनाइल पोलीस युनिट (एसजेपीयू) किंवा स्थानिक पोलिसांना कळवावी.

कलम २०च्या अंतर्गत हे माध्यमे, हॉटेल, लॉज, हॉस्पिटल, स्टुडिओ यांच्या किंवा छायाचित्रणाची सुविधा असलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्याला बंधनकारक आहे की, एखाद्या बालकाचे लैंगिक शोषण करणाऱ्या कोणत्याही सामग्रीची माहिती त्याने एसजेपीयू किंवा स्थानिक पोलिसांना द्यावी.

कलम २१ च्या अंतर्गत, जो व्यक्ती एखाद्या बालकाबाबत घडलेला लैंगिक गुन्हा पोलिसांना कळवण्यात अयशस्वी ठरला असेल त्याला कैद किंवा दंड किंवा दोन्ही ठोठावले जाऊ शकतात. जो मालक कामावर ठेवलेल्या कुणाकडूनही एखाद्या मुलासंबंधी घडलेल्या लैंगिक गुन्ह्याची दखल घेत नाही त्याला (कलम १९ आणि २० मधील व्यक्तींप्रमाणे) तुरुंगवास आणि दंड होऊ शकतो.

## १०. घटना घडल्यानंतर अत्याचारग्रस्ताने एखाद्याने जर लगेचच लैंगिक गुन्ह्याबाबत कळवले  नाही तर काय करावे?

लैंगिक हिंसेचा आघात झाल्यावर प्रत्येक जण त्याला भिन्न प्रतिसाद देतो. यात हे समजण्यासारखे आहे की, एखाद्या घटनेनंतर अत्याचारग्रस्त व्यक्ती त्वरित पोलिसांकडे जाण्याच्या अवस्थेत नसते. अशी आशा असते की, प्रत्येक अत्याचारग्रस्त व्यक्तीच्या आयुष्यात कुणीतरी विश्वासू व्यक्ती असतेच. एखादी स्वयंसेवी संस्था (एनजीओ), कार्यकर्ता, वकील, कुटुंबातील सदस्य यांतील कोणीही विश्वासू व्यक्ती सोबत असते/असावीच. जेणेकरून, त्यांना एकटे किंवा जास्तच असुरक्षित वाटू नये.

> **अत्याचारग्रस्ताने पोलिसांकडे जाण्यासाठी वेळ लावला तर अत्याचारग्रस्तानेच एखाद्या विश्वासू आधाराच्या (एनजीओ, कार्यकर्ते, वकील वा कुणीही विश्वासू व्यक्ती) मदतीने  या गुन्ह्याची प्रथम लेखी आवृत्ती रेकॉर्ड करण्याचा मार्ग शोधला पाहिजे. यात घटनेनंतर शक्य तितक्या लवकर तारीख, वेळ आणि इतर तपशील समाविष्ट केले जावेत. तारखेचा ठोस पुरावा म्हणून हे ई-मेलद्वारे किंवा रजिस्टर पोस्टाद्वारे विश्वसनीय नातेवाईक किंवा मित्राकडे पाठवावे. कोणत्याही दृश्य जखमांची तारखेच्या काही पुराव्यांसह छायाचित्रे काढली पाहिजेत.**

असे असले तरी, शक्यतो पोलिसात जाण्याबाबत जास्त विलंब होऊ द्यायला नको. लवकरात लवकर याबाबत कळवले तरच घडलेले तपशील ठळकपणे आठवण्याची शक्यता अधिक प्रभावी असते. शरीराशी संबंधित किंवा शारीरिक पुरावा गोळा केला जाऊ शकतो. यासारखे घटक गुन्हेगारास पकडण्याची आणि त्याला शिक्षा होण्याची शक्यता वाढवतात. तसेच, कोणत्याही जखम किंवा अस्वस्थतेला बरे करण्यासाठी तातडीने आवश्यक वैद्यकीय सुविधा मिळवण्यासाठीही ते गरजेचे ठरते.

## ११. अत्याचारग्रस्त व्यक्ती गुन्ह्याबाबत कळवण्यासाठी पोलिसांपर्यंत कशी पोहचू शकते?

अत्याचारग्रस्त व्यक्तीकडे पोलिसांपर्यंत पोहचण्याचे अनेक मार्ग आहेत. ते पुढीलप्रमाणे :

१

## पोलीस ठाण्यामध्ये किंवा बीट चौकीला व्यक्तीश: जाऊन

- काही राज्यांमध्ये महिलांवरील अपराधांवर प्रभावी कारवाई करण्यासाठी सगळ्या महिला पोलिसांनी चालवलेले ठाणे असते. तिथे मुख्यत्त्वे महिला पोलीस कर्मचाऱ्यांद्वारेच गुन्ह्याची पोच घेण्यासह नोंदणी आणि जेथे शक्य असेल तेथे तपासणी केली जाते. स्वत: अत्याचारग्रस्त किंवा त्याला आधार देणारी व्यक्ती त्यांच्या राज्यात अशी महिलांनी चालवलेली पोलीस ठाणी आहेत किंवा नाहीत, हे शोधू शकतात किंवा स्थानिक पोलीसही हे त्यांना सांगू शकतील.





२

- पोलीस नियंत्रण कक्षाला (१००/११२) किंवा विशेष हेल्पलाईन (उपलब्ध असल्यास) किंवा लागू असल्यास बालकांच्या हेल्पलाइनवर (१०९८) कॉल करून

- स्थानिक पोलीस स्टेशनला कॉल करून (किंवा लागू असल्यास महिला पोलीस ठाणे)






३

## ई-मेल किंवा पोस्टाद्वारे लेखी तक्रार पाठवून

फर्स्ट रिपोर्टिंगचा कोणताही मार्ग असला तरी अत्याचारग्रस्ताला तक्रार नोंदवण्यासाठी पोलीस ठाण्यातच जावे लागेल.

पोलीस नियंत्रण कक्ष किंवा विशेष हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क केल्यास पोलीस पथकाला व्हॅनमधून अत्याचारग्रस्ताच्या अचूक जागेवर पोहोचण्यासाठी त्वरित रवाना केले जावे. पोलिसांनी अत्याचारग्रस्ताला आणखी इजा होण्यापासून वाचवावे आणि आवश्यक असल्यास त्याला/तिला वैद्यकीय मदत उपलब्ध करून द्यावी. स्थानिक पोलीस ठाण्यातील कर्मचार्यांनीही गुन्हा नोंदवण्यात मदत करण्यासाठी तिथे पोहोचले पाहिजे. मुख्यत: ग्रामीण व शहरी भागात पोलीस व्हॅन सेवा पुरवल्या जातात.

जवळच्या बीट चौकीत गेल्यावर चौकीचा कार्यभार सांभाळणाऱ्याने त्यांच्या रजिस्टरमध्ये माहिती नोंदवून घेत ताबडतोब तक्रार स्थानिक पोलीस ठाण्यात पाठवावी. चौकी प्रभाऱ्याने अत्याचारग्रस्त व्यक्तीलाही कोणत्या पोलीस ठाण्यात तक्रार पाठवली आहे, ते सांगावे. पोलीस ठाण्यातले कर्मचारी तक्रार नोंदवून घेतील आणि पुढचा तपास करण्यासाठी तपास अधिकारी नेमला जाईल.

एखाद्या अत्याचारग्रस्त व्यक्तीने लैंगिक गुन्ह्यासंबंधाने बालकांसाठी चालवलेल्या हेल्पलाईनवर कॉल केला तर हेल्पलाईनने त्वरित एसजेपीयू किंवा स्थानिक पोलिसांना कळवावे. [६]

## १२. लैंगिक गुन्ह्याबाबत कळवण्यासाठी अत्याचारग्रस्त व्यक्ती कोणत्याही पोलीस ठाण्याशी संपर्क करू शकते का?

ज्या हद्दीत हा गुन्हा घडला आहे त्या पोलीस ठाण्यालाच एखाद्या गुन्ह्याबाबत कळवणे खरे तर चांगले असते. कारण, या गुन्ह्याचा पुढे तपास करणारे हेच पोलीस ठाणे असते. अत्याचारग्रस्ताला गुन्हा घडलेल्या हद्दीतले पोलीस ठाणे माहीत असणे आवश्यक आहे आणि त्याबाबतची खातरजमा करण्यासाठी तो काही ठिकाणांहून सल्ला घेऊ शकतो. (उदा. स्वयंसेवी संस्था किंवा आधार देणाऱ्या व्यक्ती)

> **एखादी अत्याचारग्रस्त व्यक्ती गुन्हा जिथे घडला आहे त्या हद्दीबाहेर असलेल्या एखाद्या पोलीस ठाण्यात गेली तर पोलिसांनी 'शून्य एफआयआर' म्हणून तक्रार नोंदवायला हवी. सोबतच ती त्या हद्दीतल्या पोलीस ठाण्यात पाठविली जाईल, याची खात्री त्यांनाच करावी लागते.**

## १३. पोलीस ठाण्यामध्ये गुन्ह्याबाबत माहिती देण्यासाठी जाताना अत्याचारग्रस्ताला लेखी तक्रार द्यावी लागते का?

गुन्ह्याबाबत माहिती देण्यासाठी जाताना अत्याचारग्रस्ताला लेखी तक्रार देणे बंधनकारक नसते. अत्याचारग्रस्त व्यक्ती पोलिसांना आपला अनुभव सांगून तोंडी तक्रार देऊ शकतो. तक्रार नोंदवण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून या व्यक्तीने दिलेली माहिती लिहून घेणे, पोलिसांना बंधनकारक आहे.

तथापि, अत्याचारग्रस्त व्यक्ती आगाऊ लेखी तक्रार तयार करू शकला तर (कोणत्याही विश्वासार्ह आधाराच्या माध्यमातूनही चालेल) त्यातून नोंदणीची प्रक्रिया सुलभ होते. यातून हे सुनिश्चित होते की, अत्याचारग्रस्त व्यक्तीच्या नजरेतून केलेली संपूर्ण प्राथमिक वस्तुस्थितीची लेखी नोंद आधीपासून हाताशी आहे. [७]

जर त्यांच्याकडे लेखी तक्रार असेल तर अत्याचारग्रस्ताने त्याच्या दोन प्रती बाळगणे अधिक चांगले आसते. तक्रारीची नोंद करण्याचा एक भाग म्हणून संबंधित पोलीस अधिकाऱ्याने त्या तक्रारीची एक प्रत एफआयआरला जोडली पाहिजे; जो की एखाद्या गुन्ह्याच्या तक्रारीची नोंद करणारा कायदेशीर दस्तऐवज आहे. (खाली तपशीलवार स्पष्ट केले आहे)

जर पोलिसांनी तत्काळ एफआयआर न नोंदवता अत्याचारग्रस्त व्यक्तीला दुसऱ्या दिवशी परत यायला सांगितले तर त्या व्यक्तीने त्या पोलीस ठाण्याकडे त्यांनी घेतलेल्या तक्रारीची एक प्रत शिक्कामोर्तब करून त्या तारखेच्या शिक्क्यासह परत देण्यास सांगावी. असे करणे पोलिसांवर बंधनकारक नाही; परंतु अत्याचारग्रस्ताने त्यासाठीची विचारणा करणे चांगले असते. लेखी तक्रार पोलीस ठाण्यात सादर केल्याचा पुरावा असणे पुढे कायदेशीर पावले उचलण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरते.




## १४. पोलिसांना यापूर्वी अत्याचारग्रस्त व्यक्ती रुग्णालयात जाऊ शकते?

होय. लैंगिक हिंसाचारामुळे अत्याचारग्रस्ताच्या आरोग्यावर अनेक तात्कालिक किंवा दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात. एखादी अत्याचारग्रस्त व्यक्ती त्वरित पोलिसांकडे जाण्यास तयार नाही म्हणून वैद्यकीय सेवा द्यायला नकार दिला जाऊ शकत नाही. कारण, वस्तुतः ॲसिड हल्ला आणि बलात्काराला बळी पडलेल्यांना रुग्णालयात मोफत प्रथमोपचार किंवा वैद्यकीय उपचार देणे, कायद्यानुसार बंधनकारक आहे. पोलिसांना माहिती देणे, हेसुद्धा कायद्यानुसार रुग्णालयांचे कर्तव्य आहे. [८]

लैंगिक हिंसेतून बचावलेल्या व्यक्तीसाठी, बालकास जर त्यांना काळजी व संरक्षणाची गरज असेल तर एसजेपीयूने एखाद्या गुन्ह्याच्या कमिशनच्या अहवालाने २४ तासांच्या आत त्यास जवळच्या रुग्णालयात नेले पाहिजे. [९]

## १५. वन स्टॉप क्रायसिस सेंटर्स (ओएससी) काय आहेत आणि ती अत्याचारग्रस्तांना कशी मदत करू शकतात?

मओएससीफ कोणत्याही प्रकारच्या हिंसेने ग्रस्त असलेल्या १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या महिला आणि मुलींना पाठबळ देण्यासाठी उभारली गेली आहेत. ती अत्याचारग्रस्तांना वैद्यकीय, कायदेशीर, मानसशास्त्रीय मदत, समुपदेशन सहाय्य आणि निवारा सुविधा पुरवतात. हे सर्व सूत्रबद्ध पद्धतीने एकाच छताखाली मिळते. [१०]

२८ राज्ये आणि ५ केंद्रशासित प्रदेशांत अशी सुमारे ५५६ केंद्रं ११ आहेत. या ओएसी अद्याप प्रत्येक राज्यात कार्यरत नाहीत, त्यामुळे अत्याचारग्रस्त कुठल्या ठिकाणी आहे त्यावर पुढच्या गोष्टी अवलंबून असतील. [११]

## १६. अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती (एससी / एसटी) समुदायातील अत्याचारग्रस्तांनी गुन्ह्याबाबत पोलिसांना कळवताना काय लक्षात ठेवावे?

एखादी अनुसूचित जाती / जमाती समुदायाच्या व्यक्तीवर जेव्हा तिच्या जातीआधारित ओळखीमुळे तिच्या जाती/जमातीची नसलेली व्यक्ती अत्याचार करते तेव्हा अत्याचारग्रस्ताने स्वत:ची जात पोलिसांना कळवणे गरजेचे आहे. सोबतच अत्याचारग्रस्त कथित दोषी व्यक्तीची जातही माहीत असल्यास पोलिसांना सांगू शकतो. हातात आलेली तथ्यं आणि अत्याचारग्रस्त व दोषी कुठल्या समुदायातून येतात ते समजल्यावर पोलिसांना ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करावा लागतो.

## १७. मानसिक किंवा शारीरिकरीत्या अक्षम (तात्पुरते किंवा कायम) असलेल्या अत्याचारग्रस्तांनी लैंगिक गुन्ह्याबाबत कळवण्याचे ठरवले तर त्यांना मदत करण्यासाठी पोलिसांनी विशेष पावले उचलण्याची गरज आहे का?

**होय, विशिष्ट गुन्ह्यांत १३ अत्याचारग्रस्त व्यक्ती महिला असेल, तर कायदेशीर व्यवस्थेने विशेष पावले उचलणे आवश्यक आहे.**

एकदा पोलिसांना कळविण्यात आले की, अपंग अत्याचारग्रस्त महिलेला तक्रार नोंदवायची आहे, तेव्हा मग पोलिसांनी ती तक्रार तिच्या निवासस्थानावर किंवा तिने सांगितलेल्या ठिकाणी जात नोंदविली पाहिजे. कुणी दुभाषी / विशेष शिक्षक यांची उपस्थिती पाहिजे आणि सोबतच या सगळ्याचे व्हिडिओ चित्रणही झाले पाहिजे.



शिवाय त्या महिलेचे स्टेटमेंट पोलिसांनी लवकरात लवकर न्यायालयीन दंडाधिकाऱ्यांसमोर नोंदवणे आवश्यक आहे. १४

भाग क

# एफआयआर (फर्स्ट इन्फॉर्मेशन रिपोर्ट)च्या रूपात तक्रारीची नोंदणी

## १८. फर्स्ट इन्फर्मेशन रिपोर्ट (एफआयआर) काय आहे?

पोलिसांना पीडित / अत्याचारग्रस्ताकडून गुन्ह्याची तक्रार मिळताच त्यांना गुन्ह्याची नोंद, ज्याला फर्स्ट इन्फर्मेशन रिपोर्ट म्हणतात, ती करावी लागते. हे त्यांचे कायदेशीर कर्तव्य आहे.

एफआयआर हा पोलिसांनी तयार केलेला लेखी दस्तावेज आहे. हा त्या माहितीचा अहवाल आहे. एक किंवा अनेक गुन्हे घडल्यावर पोलिसांकडे सर्वांत आधी जी माहिती पोचते ती म्हणजे एफआयआर. पोलिस ठाण्यात व्यक्तीने गुन्ह्याची माहिती कळवल्यावरच पोलिस त्यांचा तपास सुरू करू शकतात. पोलिसांनी एफआयआर नोंदवणे ही कायदेशीर प्रक्रियेला गती देण्याची पहिली पायरी आहे

## १९. गुन्ह्यांची तक्रार मिळाल्यानंतर पोलिसांकडे एफआयआर नोंदवून न घेण्याचा पर्याय असतो का?

नाही. जर एखाद्या तक्रारीत दखलपात्र गुन्हा घडल्याची नोंद केली गेली तर त्यांना लागलीच एफआयआर दाखल करावी लागते. सर्व गुन्ह्यांची कायद्यात एकतर गंभीर (दखलपात्र) किंवा कमी गंभीर (अदखलपात्र) अशी वर्गवारी केली गेलीय. सर्व लैंगिक गुन्हे हे दखलपात्र, अर्थात गंभीर गुन्हे आहेत.

क्रिमिनल प्रोसिजर कोड (सीआरपीसी) हा एक महत्त्वाचा कायदा आहे जो कार्यपद्धती निश्चित करतो

पोलिस आणि कोर्टाला या कायद्यानुसारच गुन्ह्याच्या प्रकरणाचा पाठपुरावा करावा लागतो. जेव्हा पोलिसांनी गुन्हेगारी प्रकरणाची नोंद आणि तपास करण्याची गोष्ट येते, तेव्हा गंभीर गुन्हा घडल्याची माहिती मिळाली असेल, तर सीआरपीसी त्यांना एफआयआर नोंदवणे बंधनकारक करते.१५ सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे, तो गुन्हा गंभीर असेल, तर पोलिस ही माहिती खरोखर सत्य आहे का, याविषयी साधा प्रश्नही विचारू शकत नाहीत. पोलिसांना ती व्यक्ती काय सांगते आहे, ते लिहून घेत त्यावर आधारित एफआयआर नोंदवावी लागेल.[१६]


## २०. लैंगिक गुन्ह्यांसाठी एफआयआर नोंदवण्यापूर्वी पोलिस प्राथमिक चौकशी करू शकतात का?

> **आयपीसी आणि पॉक्सोमधील सर्व लैंगिक गुन्हे हे दखलपात्र गुन्हे असल्याने पोलिस प्राथमिक माहितीची पडताळणी करण्यासाठी आम्हाला प्राथमिक चौकशी करावी लागेल, असे म्हणू शकत नाहीत.**

नोंदणी करण्यापूर्वी प्राथमिक चौकशी करण्याची परवानगी केवळ काहीच मर्यादित प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. (वैवाहिक विवादांसह, व्यावसायिक गुन्हे, वैद्यकीय निष्काळजीपणाची प्रकरणे, भ्रष्टाचाराची प्रकरणे किंवा अशी प्रकरणे जिथे खूप चालढकल झाल्यासारखे दिसते आहे.) या प्रकरणांमध्येसुद्धा केवळ हा दखलपात्र गुन्हा आहे का नाही हे समजून घेण्यासाठीच प्राथमिक चौकशी करता येते. प्राप्त झालेल्या माहितीची पडताळणी करण्यासाठी नाही.१८ इतर सर्व प्रकरणांमध्ये, पोलिसांना प्राथमिक चौकशी करण्यास मनाई आहे.

जर पोलिसांनी एखाद्या अत्याचारग्रस्ताला सांगितले, की गुन्हा नोंदवण्यापूर्वी त्यांना प्राथमिक चौकशी करावी लागेल, तर अत्याचारग्रस्त पोलिसांना हे सांगून प्रतिसाद देऊ शकतात की ही गोष्ट मललिता कुमारी विरुद्ध उत्तर प्रदेश सरकारमधील सर्वोच्च न्यायालयाचा निकालफयाअंतर्गत बेकायदेशीर आहे.

## २१. एफआयआरमध्ये काय असावे?




एफआयआरमध्ये तुम्हाला माहीत असलेली किंवा सांगितली गेलेली तथ्ये आणि माहिती समाविष्ट केली पाहिजे. आपण कळवलेली कोणतीही माहिती पोलिस बदलू शकत नाहीत.

एफआयआरमध्ये समाविष्ट करण्याच्या हेतूने तुमच्याकडून काही माहिती पोलिसांना सांगितली गेली पाहिजे. ती पुढीलप्रमाणे आहे.

- **लैंगिक गुन्हा घडली तेव्हाची तारीख, वेळ आणि ठिकाण**
- **तक्रारदार म्हणून आपले नाव, पूर्ण पत्ता आणि फोन नंबर**
- **घटना आठवते त्याप्रमाणे जशी घडली त्याप्रमाणे, त्याची सत्य माहिती.**
- **गुन्हेगारी कृत्य जसे घडले त्याचा तपशील (उदाहरणार्थ, शारीरिक जखम किंवा वापरली गेलेली हत्यारे)**
- **घटनेत सहभागी असलेल्या व्यक्तींची नावे, संपर्क आणि वर्णन; तुम्हाला आरोपींची नावे माहित नसल्यास, त्यांची ओळख पटवण्यात मदत करण्यासाठी काही तपशील द्या. जसे की, त्या व्यक्तीचे लिंग, अंदाजे वय, शारीरिक ठेवण आणि उंची किंवा कोणतीही ओळख पटवू शकतील अशी खास वैशिष्ट्ये किंवा त्यांच्या शरीरावर किंवा बोलण्यात सापडणाऱ्या खुणा.**
- **आरोपींशी अत्याचारग्रस्त व्यक्तींचा नातेसंबंध (जर असेल तर.)**
- **वारंवार पुनरावृत्ती केली गेलेली असल्यास, त्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांची संख्या**
- **गुन्ह्याच्या तारखेपासून गुन्हा नोंदवल्यास उशीर होण्याची कारणे (लागू असल्यास)**

गुन्ह्याचे प्रकरण आणि काय घडले यावर अवलंबून आपण खालील प्रकारची माहितीदेखील एफआयआरमध्ये टाकण्यासाठी, गरजेची वाटल्यास, देऊ शकता. अधिकाधिक तपशील दिला तरच पुढील गोष्टी तुमच्यासाठी सोयीच्या होऊ शकतात.

**उदाहरणार्थ :**

- जर अंगावरचे कपडे उतरवण्यासाठी किंवा स्पर्श करण्यासाठी बळाचा वापर केला गेला असेल
- लैंगिक शेरेबाजी आणि / किंवा लैंगिक मागण्या केल्या असल्यास
- जर आरोपीने तुमच्या हालचालींवर पाळत ठेवली असेल
- आरोपीने लैंगिक स्वरूपाचा कोणताही व्हिडिओ किंवा इतर सामग्री दाखवली किंवा पाठवली असेल तर
- बंदुक किंवा कोणत्याही प्रकारचे शस्त्र वापरून धमक्या दिल्यास
- अमली पदार्थ, औषधे किंवा इतर कोणत्याही प्रकारची प्रलोभने बळजबरीने दिली गेली असतील तर
- आरोपीने या कृत्याचे व्हिडिओ चित्रण केले असेल तर
- जर आरोपीने ममारहाण झाल्याचा गुन्हा नोंदवला गेला तर व्हिडिओ पसरविण्याचीफधमकी दिली

## २२. एफआयआर नोंदवण्यासाठी पोलिसांनी कोणती प्रक्रिया पाळली पाहिजे?र

सीआरपीसीच्या कलम १५४ मध्ये एफआयआर नोंदवण्यासाठी पोलिसांनी अवलंबण्याच्या प्रक्रियेची यादी दिलेली आहे. ती याप्रमाणे -

१

**अत्याचारग्रस्त महिला तक्रार नोंदवण्यासाठी स्वतः पोलिस स्टेशनमध्ये गेली तर महिला पोलिस अधिकाऱ्यांनी सगळी माहिती घेत नोंदवून घेतली पाहिजे.**



२

**आपण तोंडी माहिती देणार असाल तर पोलिस अधिकाऱ्याने तुम्हाला ती सांगण्याची विनंती करावी. यामुळे माहिती तुमच्या शब्दाच्या जवळ जाणाऱ्या आणि शक्य तितक्या सोप्या आणि सोप्या भाषेत तो लिहू शकेल.**




३

पोलिसांनी सगळी माहिती नोंदवून घेतल्यानंतर त्यांनी तुम्ही मागणी केल्यास ती वाचून दाखवली पाहिजे. माहिती सांगणारी व्यक्ती या नात्याने तो तुमचा हक्क आहे.



४


एकदा एफआयआर तयार झाल्यानंतर त्यावर माहिती देणार्यात व्यक्तीने सही केली पाहिजे. पोलिसांनी नोंदवलेली माहिती अचूक असल्याची खात्री झाल्यानंतरच तुम्ही त्यावर स्वाक्षरी करावी. लक्षात ठेवा, तुम्ही जे सांगितलेय तेच एफआयआरमध्ये दिसले पाहिजे.




जे लोक वाचू किंवा लिहू शकत नाहीत त्यांनी वरील खात्री करून घेतल्यावर एफआयआरपुढे आपल्या डाव्या हाताच्या अंगठाची छाप लावावी.

५

**एफआयआरची प्रत त्वरित आणि विनामूल्य मिळवणे हासुद्धा आपला अधिकार आहे. पोलिसांनी ती दिली नाही तर एफआयआरची प्रत मागून घ्या.**




**पोलिस स्टेशनच्या डायरीमध्ये एफआयआरची तारीख आणि ठळक मजकूर, पोलिसांनी नोंदवला पाहिजे.**




## २३. पॉक्सो कायदा व नियमांअंतर्गत एफआयआर नोंदवण्यासाठी पाळल्या जाव्यात अशा काही अतिरिक्त कार्यपद्धती आहेत का?

हो आहेत. मसीआरपीसीफमधील कलम १५४ मधील सर्व कार्यपद्धती बालकाविषयी घडलेल्या लैंगिक गुन्ह्याची एफआयआर नोंदवताना पाळल्या गेल्या पाहिजेत. सोबतच पॉक्सो कायदा आणि नियम अत्याचारग्रस्त बालकांना मदत करण्यासाठी मोलाचा हातभार लावतात.

कायद्याच्या कलम १९ नुसार एसजेपीयू किंवा स्थानिक पोलिसांना तक्रार किंवा लैंगिक गुन्ह्याची माहिती मिळाली, की लगोलग त्यांना :

- एक एंट्री क्रमांक ठरवत तो लेखी नोंदवावा लागतो.
- तो तुम्हाला वाचून दाखवावा लागतो.

- एसजेपीयूने ठेवलेल्या रजिस्टरमध्ये किंवा पोलिस स्टेशनच्या डायरीत तो क्रमांक नोंदवावा लागतो.
- जेव्हा एखादे अत्याचारग्रस्त बालक गुन्ह्याबाबत कळवत वा तक्रार नोंदवत असेल, तेव्हा पोलिसांना त्या बालकाला समजावे हेतूने सोप्या भाषेत एफआयआर लिहावा लागतो.
- एफआयआर ज्या भाषेत लिहिला जात आहे ती बालकाला समजत नसेल तर पोलिसांना त्याला अनुवादक किंवा दुभाषी द्यावा लागतो.

एफआयआर लिहिणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला खालील गोष्टी तुम्हाला सांगाव्या लागतात [१९] :
- तिचे / त्याचे नाव आणि पदनाम
- तिचा / त्याचा पत्ता आणि फोन नंबर
- पर्यवेक्षण अधिकाऱ्याचे नाव, पदनाम आणि संपर्क तपशील

एफआयआर नोंदवल्यानंतर २४ तासांच्या आत, स्थानिक पोलिस किंवा एसजेपीयूला प्राथमिक मुल्यांकन अहवाल नोंदवून भरणे आवश्यक आहे. (परिशिष्ट १ पहा) सोबतच त्या बालकाला बालकल्याण समितीकडे पाठवणे आवश्यक आहे. कारण ही समिती बालकांची विशेष काळजी घेत त्यांचे संरक्षण करते.[२०]

## २४. अत्याचारग्रस्ताला तक्रार नोंदवताना मदतनीसाची मदत घेण्याचा हक्क आहे का?

पॉक्सो कायदा अत्याचारग्रस्त बालकांना सहाय्य करणार्या व्यक्तींची मदत घेण्याचा अधिकार देतो.[२१]
ते स्वयंसेवी संस्था किंवा व्यावसायिक कार्यकर्ता किंवा मानसशास्त्र, सामाजिक कार्य किंवा बालविकासातील तज्ज्ञ यांपैकी कुणीही असू शकतात. याबाबत बाल अत्याचारग्रस्तांना अशा लोकांची मदत घेत विविध सहाय्य मिळवण्याची गरज पाहता प्रत्येक राज्य सरकारने मार्गदर्शक तत्त्वे तयार केली पाहिजेत.

नोंदणीच्या वेळी पोलिसांना मुलाला किंवा त्यांच्या पालकांना अशा सहाय्य सुविधांच्या उपलब्धतेबाबत माहिती द्यावी लागते. जसे की समुपदेशन आणि त्यांना हव्या असलेल्या सुविधांशी जोडून देणे.[२२]

प्रौढ अत्याचारग्रस्त आवश्यक असतील त्यांची मदत आणि इतर सहाय्य घेऊ शकतात, परंतु त्यांनी ते स्वतःच शोधणे अपेक्षित असते. उदाहरणार्थ- दिल्लीसारख्या काही ठिकाणी[२३] बलात्कारासारख्या अत्याचाराला सामोरे गेलेल्यांसाठी समुपदेशन सेवा आहेत. त्या संबंधितांना नोंदणीवेळी पुरवल्याही जातात.

### ओएससीमधील पोलिस सुविधा अधिकारी

**प्रत्येक ओएससीकडे एक पोलिस सुलभता अधिकारी (पीएफओ) असावा, जो अत्याचारग्रस्तांसाठी आधार देणारा म्हणून काम करेल. विशेषतः पोलिसांसोबत संवाद-व्यवहार करताना ही व्यक्ती उपयोगी पडेल. अत्याचारग्रस्त व्यक्ती पोलिस स्टेशनला जाऊ शकत नसेल, तर तिची तक्रार नोंदवण्यासाठी पीएफओ पुढाकार घेतो. तो अत्याचारग्रस्ताची सहमती मिळवत तिच्या घरून/ओएससीतून/रुग्णालयातून तक्रार नोंदवण्याचे काम केले जाईल, याची खात्री करतो.**[२४]

## २५. गुन्हा नोंदणीवेळी अत्याचारग्रस्तांना वकील घेण्याचा हक्क आहे का?

होय.

१९९४ च्या दिल्ली डोमेस्टिक वर्किंग वुमेन्स व्हर्सेस युनियन ऑफ इंडिया अँन्ड ऑदर्स या खटल्यात[२५] सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले होते, की लैंगिक अत्याचारातग्रस्तांना (बलात्कारग्रस्तांचा संदर्भ घ्यावा) नोंदणीच्या वेळी पोलिस स्टेशनमध्ये वकीलाला भेटता आले पाहिजे. त्या व्यक्तीला कोणतेही प्रश्न विचारण्यापूर्वी आणि तिची चौकशी केली जात असताना हे झाले पाहिजे. या हक्काची माहिती अत्याचारग्रस्ताला देणे आणि ती दिल्याचे लेखी नोंदवून ठेवणे हे पोलिसांचे अत्यावश्यक कर्तव्य आहे. प्रत्येक पोलिस ठाण्याकडे ज्यांच्याशी अत्याचारग्रस्त संपर्क साधू शकतील अशा वकीलांची यादी उपलब्ध असावी.

शक्य असल्यास, अत्याचारग्रस्त एखाद्या विधीविषयक काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेकडे जाऊन खासगी वकीलाची मागणी करू शकतात किंवा त्या व्यक्तीला ज्यांची फी परवडेल अशा वकीलाकडे पाठवले जाऊ शकते.[२६]

महिला व बाल अत्याचारग्रस्तांसह अनुसूचित जाती किंवा जमातीच्या सदस्यांना वकिलांची परवडत नसल्यास त्यांना मोफत कायदेशीर मदत आणि सेवा मिळवण्याचा हक्क आहे.[२७]

पॉक्सो कायद्याच्या कलम ४० अंतर्गत, बाल अत्याचारग्रस्त किंवा त्यांचे कुटुंब किंवा संरक्षक त्यांच्या पसंतीचा वकिल निवडू शकतात. त्यांना वकील परवडत नसेल तर वकिलाची विनामूल्य नियुक्ती करण्यासाठी ते कायदेशीर सेवा प्राधिकरणाला संपर्क करू शकतात. पोलिसांनी बालक आणि/किंवा त्यांच्या पालक किंवा संरक्षकाला वकील आणि कायदेशीर सल्ला मिळण्याचा अधिकार असल्याचे सांगावे लागेल.[२८]

## २६. पोलिस तुमची तक्रार चुकीची आहे म्हणत नाकारू शकतात?

**नाही, लैंगिक गुन्ह्याबद्दलच्या तक्रारीला पोलिस खोटी म्हणू शकत नाहीत.**

लैंगिक गुन्हा झाल्याचे उघड होत असल्यास ते माहिती / तक्रारीची अधिकृतता किंवा विश्वासार्हतेवरदेखील प्रश्न उपस्थित शकत नाहीत. पोलिसांना एफआयआरच्या स्वरूपात तक्रार नोंदवावी लागेल. पोलिस ठाण्यातील अधिकारी तक्रारीला खोटी म्हणत असल्यास अत्याचारग्रस्ताने जिल्हा पोलिस प्रमुखांकडे तक्रार करावी.

## २७. पोलिस वाचलेल्याला तक्रार मागे घेण्यास सांगू शकतात का?

नाही, पोलिस कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करू शकत नाहीत किंवा मध्यस्थी वा तडजोड करण्यास सांगू शकत नाहीत. त्यांनी तसे केले तर ते त्यांच्या कायदेशीर कर्तव्याचे उल्लंघन करीत आहेत असा अर्थ होतो. असे झाल्यास, अत्याचारग्रस्ताने जिल्हा पोलिस प्रमुखांकडे तक्रार करावी.

## २८. पोलिस अत्याचारग्रस्ताला त्याच्या तक्रारीची काही तथ्यं बदलायला लावू शकतात का?

नाही, तोंडी असो किंवा लेखी, पोलिसांना जी माहिती दिली जाते ती जशीच्या तशीच पोलिसांनी नोंदवली पाहिजे. ते कोणतीही माहिती बदलू किंवा तिचा अर्थ सौम्य करू शकत नाहीत.

## २९. पोलीस तुम्हाला पोलीस स्टेशनमध्ये वाट बघत थांबायला लावू शकतात का?

पोलीस तुम्हाला केवळ कायदेशीर आणि योग्य कारणासाठी वाट बघत ताटकळायला लावू शकतात. जसे की, अत्याचारग्रस्ताला मदत करण्यासाठी महिला पोलिस अधिकारी पोलिस ठाण्यात पोचायला थोडा वेळ लागतो आहे. किंवा एखादे वकील किंवा अनुवादक थोड्या वेळात येणार असल्यास. पोलिसांचे कर्तव्य आहे, की माहिती तुमच्या डोक्यात ताजी आणि स्पष्ट असतानाच लवकरात लवकर अचूक एफआयआर नोंदवून घेतली जावी. पोलीस कुणालाही तासन् तास कुठलाही खुलासा वा कारण न देता ताटकळत ठेवू शकत नाहीत.



## ३०. पोलिसांनी सांगितले असता तुम्ही कोऱ्या कागदावर सही करावी का?

अजिबात नाही. कोणाला कोऱ्या कागदावर सही करण्यास सांगणे, विशेषतः त्यासाठी धमकावणे वा बळजबरी करणे ही बाब कायदेशीरदृष्ट्या पोलिसांच्या विरोधात जाणारी आहे. लक्षात ठेवा, की तुम्ही सांगितल्याप्रमाणे एफआयआर अचूक आणि स्पष्ट पद्धतीने लिहिला गेल्याची खात्री झाल्यावरच तुम्ही त्याच्यावर सही केली पाहिजे. पोलीस तुम्हाला कोऱ्या कागदावर सही करायला सांगत असतील तर तुम्ही नकार द्यावा आणि जिल्हा पोलीसप्रमुखांकडे तक्रार करावी.

भाग ड

# तक्रार नोंदवून न घेतली गेल्यास करावयाचे उपाय

## ३१. पोलिस जर ठाण्यात एफआयआर नोंदवून घेत नसतील तर तुम्ही काय करू शकता?

**लैंगिक गुन्ह्यात एफआयआर नोंदविण्यात पोलिसांना अपयश येणे बेकायदेशीर आहे.**

हे लैंगिक अत्याचाराच्या सर्व प्रकारच्या गुन्ह्यांना लागू होते. असे झाल्यास अत्याचारग्रस्तांकडे एफआयआर नोंदवून घेण्यासाठी दोन स्तरांवर उपाय उपलब्ध आहेत. हे उपाय 'सीआरपीसी'अंतर्गत उपलब्ध आहेत.

१




जिल्हा पोलीस अधीक्षकांना (एसपी अर्थात जिल्हा पोलिसप्रमुख) लेखी तक्रार पाठवा. एसपी पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्याना एफआयआर नोंदवून घेण्याचे आदेश देऊ शकतात. तुम्ही शहरी भागात असाल तर तुम्ही तुमची तक्रार पोलीस उपायुक्तांकडे (डीसीपी) पाठवू शकता. डीसीपी शहरी भागातील पोलिस जिल्ह्यांचे प्रमुख असतात.




२

कलम १५६ (३), सीआरपीसी[३०] अंतर्गत क्षेत्र न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज दाखल करा.[३०] पोलिसांना तक्रार नोंदवत तपास सुरू करण्यासाठीचे आदेश देण्याबाबत कोर्टाला विनंती करा.

**वकील किंवा स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या सल्ला किंवा सल्ला घेणे अत्याचारग्रस्तासाठी मोलाचे ठरू शकते. विशेषतः एसपी/डीएसपीला देण्याच्या तक्रारीचा मसुदा तयार करताना त्यांचा उपयोग होतो. दंडाधिकाऱ्यारी न्यायालयात जाण्यासाठी वकिलाची आवश्यकता असते.**

## ३२. आपण इतर कोणत्याही अधिकाऱ्यांकडे तक्रार करू शकता?

होय, आपण राष्ट्रीय / राज्य मानवाधिकार आयोग, राष्ट्रीय / राज्य महिला आयोग किंवा ओएससीकडे लेखी तक्रारसुद्धा पाठवू शकता.

तुमच्याजवळ वनस्टॉप क्रायसिस सेंटर असेल तर तिकडेही तुम्ही जाऊ शकता. तुमची तक्रार आणि जिल्हा पोलीसप्रमुखांकडे करण्याचा पाठपुरावा यासाठी पीएफओ तुम्हाला मदत करू शकते.

## ३३. जिल्हा एसपी आणि दंडाधिकारी यांना देण्याच्या तक्रारींमध्ये काय समाविष्ट केले पाहिजे?

**या तक्रारींमध्ये पुढील माहिती टाकणे योग्य होईल.**

- तक्रारदाराची आणि मूळ तक्रारीची थोडक्यात माहिती (शक्य असल्यास मूळ लेखी तक्रारीची प्रत जोडा. आणि / किंवा पोलिस स्टेशनकडून मिळालेली कोणतीही पावती)
- पोलिसांना कळवण्यासाठी ज्या एका किंवा अनेक तारखांना तुम्ही गेलात त्या तारखा.
- पहिली तक्रार नोंदवण्याच्या प्रयत्नापासून आजवर गेलेला वेळ नमूद करा.
- तक्रारदाराला / अत्याचारग्रस्ताला त्याची / तिची प्राथमिक चौकशी करावी लागेल असे सांगितले गेले असल्यास तसे नोंदवा. आणि तक्रारीत नमूद करा की यामुळे 'ललिता कुमारी जजमेंट'चे उल्लंघन होते.
- अत्याचारग्रस्ताला वारंवार धमकी किंवा हल्ल्यांचा सामना करावा लागला असल्यास पहिल्यांदा तक्रार करण्याच्या प्रयत्नापासून हे किती वेळा घडले ते नोंदवा.३१
- तक्रार नोंदवून घेणे ज्यांनी नाकारले त्या पोलीस अधिकाऱ्यांचा तपशील - नाव, हुद्दा, पोलीस स्टेशन, जिल्हा.
- दिलेल्या परिस्थिती / कारणांचे थोडक्यात वर्णन करा.
- पोलिसांनी केलेल्या कोणत्याही अपमानकारक / आक्षेपार्ह टिपण्या समाविष्ट करा.

न्यायिक दंडाधिकाऱ्यांना दिलेल्या अर्जात, एसपी / डीसीपीकडे दिलेल्या तक्रारीची एक प्रत जोडा. पोलिसांनी दिलेला प्रतिसाद, तुम्ही पोलिस ठाण्याला दिलेल्या भेटींची संख्या आणि एसपी / डीसीपीने एफआयआर न नोंदवता तपासासाठी काही आदेश दिले असल्यास ते दर्शवा.

एसपी आणि दंडाधिकारी या दोघांनाही त्यांच्याकडून प्रभारी अधिकाऱ्याकडे आदेश मागवा जेणेकरून एफआयआर तत्काळ नोंदवता येईल.

## ३४. एसपी / डीसीपी एफआयआर नोंदवण्याऐवजी चौकशीचे आदेश देऊ शकतात का?

एसपी / डीसीपीला दिलेल्या तक्रारीत लैंगिक गुन्हा झाल्याचे उघडकीस आले, तर एसपीने पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला आदेश देत त्याने तक्रार नोंदवून घेतली असल्याची खात्री करणे बंधनकारक आहे. एसपी लेखी आदेश किंवा सूचना देत असल्यास उत्तम.

## ३५. तुम्ही एसपी / डीसीपीकडे तक्रार कशी पाठवाल?

तक्रार लेखी असणे आवश्यक आहे. तुम्ही ती नोंदणीकृत पोस्टद्वारे पाठवू शकता (एसपी / डीसीपीच्या कार्यालयात ती पोचल्याची पावती यातून मिळेल) शक्य असल्यास स्वत: प्रत्यक्ष जातच ही तक्रार दिली पाहिजे. त्यातून तक्रारीवर तातडीने कारवाई होण्याची शक्यता वाढते. पोलिस जिल्हाप्रमुख म्हणून एसपी / डीसीपी सहसा त्यांच्या कार्यालयात नसतात किंवा व्यस्त असतात. म्हणून वाट पाहणे टाळण्यासाठी एसपी / डीसीपीला त्यांच्या उपलब्ध असण्याची वेळ आधी जाणून घेत भेटणे चांगले.

## ३६. तुम्ही क्षेत्र दंडाधिकाऱ्यांकडे जाण्यासाठी काय कराल?

कलम १५६ (३), सीआरपीसी अंतर्गत अर्जाचा मसुदा तयार करण्यास तुम्हाला आधी वकीलाला गाठावे लागेल. मग तो अर्ज सर्व इतर दस्तावेजांसह स्थानिक दंडाधिकाऱ्यांच्या कोर्टात तुम्ही देऊ शकता. यातही वकील मदत करेलच. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून तुम्हाला वकील मिळू शकतो. किंवा बिगरसरकारी संस्थेमार्फत खासगी वकीलही ही सेवा देऊ शकतो. न्यायालय सुनावणी घेईल त्या वेळी तुमच्या वकिलाने तिथे उपस्थित असले पाहिजे. न्यायालय एफआयआर नोंदवून तपास सुरू करण्याचा आदेश कोर्ट पोलिसांना देऊ शकते.

## ३७. पोलिसांनी कोर्टाच्या आदेशानुसार कारवाई केली नाही तर दंडाधिकारी काय करू शकतात?

जर पोलिसांनी न्यायदंडाधिकारी यांच्या आदेशानुसार कारवाई केली नाही तर आपला वकील कोर्टाला पोलिसांकडून स्टेटस रिपोर्ट आणि काय कारवाई केली त्याचा अहवाल मिळावा अशी विनंती करू शकतो. यातून पोलिस पुढची कारवाई करण्यासाठी बाध्य होतील.

भाग ई

# तक्रार नोंदवून न घेतल्यास पोलिसांना कसे जबाबदार धरावे?

## ३८. पोलिसांनी एफआयआरच्या रूपात तक्रार नोंदवून घेतली नाही, तर त्याबद्दल तुम्ही त्यांच्यावर कारवाई करू शकता का?

**लैंगिक गुन्ह्यांमध्ये एफआयआर नोंदवणे पोलिसांना बंधनकारक आहे. ती तशी न नोंदवणे आयपीसी, पॉक्सो आणि अँट्रॉसिटी कायद्यांतर्गत बेकायदेशीर आहे. खरं तर, हा गुन्हाच आहे.**

● आयपीसीअंतर्गत लैंगिक गुन्ह्यांची नोंद करण्यात पोलिस अयशस्वी ठरल्याबद्दल तुम्ही आयपीसीचे कलम १६६ ए (सी) अंतर्गत तक्रार दाखल करू शकता.

● मपोक्सोफ कायद्यांतर्गत एखाद्या बालकाबाबत घडलेला लैंगिक गुन्हा नोंदविण्यात पोलिस अयशस्वी ठरल्याबद्दल तुम्ही कलम २१ (१) अन्वये तक्रार दाखल करू शकता.

● तुम्ही अनुसूचित जाती किंवा जमातीतले असाल आणि ज्याच्याविरुद्ध तक्रार करायचीय तो पोलिस अधिकारी या समुदायाबाहेरचा असेल (एससी किंवा एसटी नसेल) तर ॲतट्रॉसिटी कायद्याच्या कलम ४ अंतर्गत तुम्ही तक्रार दाखल करू शकता

## ३९. कलम १६६ ए (सी) आयपीसी काय म्हणते?

या कलमात नमूद केलेले आहे, की एखाद्या जनसेवकाला खाली दिलेल्या विशिष्ट गुन्ह्यांच्या तक्रारी नोंदविण्यात अयशस्वी झाल्याबद्दल २ वर्षांपर्यंतचा कारावास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते. मात्र याची नोंद घ्या, की आयपीसी अंतर्गतचे सर्व लैंगिक गुन्हे हे कलम १६६ ए (सी) अंतर्गत समाविष्ट होत नाहीत. या तक्त्यामध्ये याअंतर्गत येणारे नेमके गुन्हे समाविष्ट केले आहेत.

### १६६ अ : कायद्यात दिलेल्या सूचनांची लोकसेवकाकडून अवाज्ञा -

कोणताही लोकसेवक -
(क) भारतीय दंड संहिता, १९७३ मधील कलम १५४ च्या उपविभाग (१) अंतर्गत दिलेली कायद्याने चौकशी करण्याजोग्या खालील शिक्षा असणाऱ्या गुन्ह्यांची कोणतीही माहिती नोंदवून घेण्यात अपयशी ठरल्यास :

| | |
|---|---|
| ३२६ अ | ॲसिडचा वापर करून मुद्दाम गंभीर दुखापत करणे |
| ३२६ ब | मुद्दाम ॲसिड फेकणे किंवा फेकण्याचा प्रयत्न करणे |
| ३५४ | स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने केलेला हल्ला किंवा गुन्हेगारी बळजबरी |

| | |
|---|---|
| ३५४ ब | विनयभंग करण्याच्या उद्देशाने केलेला हल्ला किंवा गुन्हेगारी बळजबरी |
| ३७० | व्यक्तीची तस्करी |
| ३७० अ | तस्करी केलेल्या व्यक्तीचे शोषण |
| ३७६ | बलात्कार |
| ३७६ अ | बलात्कारामुळे मृत्यू किंवा कोमा अवस्था |
| ३७६ ब | वेगळे होण्याच्या काळात पतीकडून पत्नीशी केलेला लैंगिक संभोग |
| ३७६ क | अधिकारी पदावर असलेल्या व्यक्तीकडून केला गेलेला लैंगिक संभोग |
| ३७६ ड | सामुहिक बलात्कार |
| ३७६ इ | पुन्हा तोच गुन्हा करणे (३७६, ३७६ अ, ३७६ ड अंतर्गत) |
| ५०९ | स्त्रीच्या चारित्र्याचा अपमान करण्यासाठी वापरलेला शब्द, हावभाव, कृती |

त्याला अत्यंत कठोर कारावासाची शिक्षा देण्यात यावी. कारावासाचा काळ सहा महिन्यांपेक्षा कमी असू नये मात्र तो दोन वर्षांपर्यंत वाढवला जाऊ शकतो, आणि दंडासही पात्र धरावे.

## ४०. पॉक्सो कायद्यातील कलम २१ (१) काय म्हणते?

हे कलम १९ (२) अंतर्गत येणाऱ्या पोलिसांच्या कर्तव्याबद्दल बोलते. हे कर्तव्य एसजेपीयू किंवा स्थानिक पोलिसाला बालकावर लैंगिक अत्याचार झालेला असल्याची तक्रार किंवा माहिती मिळताच एफआयआर नोंदवणे बंधनकारक करते. हे कलम असे म्हणते, की जो कोणी गुन्हा नोंदवण्यात अयशस्वी होतो त्याला कलम १९ (२) नुसार सहा महिने कारावासाची शिक्षा किंवा दंड अथवा दोन्ही होऊ शकतो.

> **२१. गुन्हा नोंदवण्यास किंवा रेकॉर्ड करण्यात अयशस्वी झाल्याबद्दल शिक्षा - (१) कोणतीही व्यक्ती, जी कलम १९ च्या पोटकलम (१) किंवा कलम २० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात अयशस्वी ठरली किंवा जी कलम १९ च्या पोटकलम (२) अन्वये गुन्ह्याचे दस्तावेजीकरण करण्यात (रेकॉर्ड) अपयशी ठरली, तिला कारावासाची शिक्षा होईल जी सहा महिन्यांपर्यंत वाढू शकते. आणि / किंवा दंडही होऊ शकतो.**

## ४१. ॲट्रॉसिटी कायद्याच्या कलम ४ मध्ये काय म्हटले आहे?

कलम ४ काही विशिष्ट कर्तव्ये स्पष्ट करते. या कलमांतर्गत सार्वजनिक सेवेत असलेल्या व्यक्तींसाठी (यात पोलिस अधिकाऱ्यांचाही समावेश आहे) या कर्तव्यांचे पालन करणे बंधनकारक आहे. या कर्तव्यामध्ये काही विशिष्ट गोष्टींचा समावेश आहे. एफआयआर नोंदवण्यासाठीच्या प्रक्रियेदरम्यान पोलिसांना खालील गोष्टींचे पालन करावे लागेल :

- तुम्ही तोंडी माहिती दिली तर पोलिसांना ती लिहावी लागेल आणि तुमची सही घेण्यापूर्वी तुम्हाला वाचूनही दाखवावी लागेल.
- एफआयआर नोंदवावी लागेल आणि ॲट्रॉसिटी कायद्यातील सर्व कलमांचा योग्यरीत्या समावेश केला गेला असल्याचे सुनिश्चित करावे लागेल.
- एफआयआरची नोंद झाल्याबरोबर लागलीच त्याची प्रत तुम्हाला मिळतेय ना, याची खात्री करावी लागेल.

चौकशीनंतर जर आढळले, की एखाद्या सार्वजनिक कर्मचाऱ्याने (जो अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीचा नाही) ही कर्तव्ये पार पाडली नाहीत, तर त्याला शिक्षा होऊ शकते. ही शिक्षा सहा महिन्यांपासून ते एक वर्षापर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा असते.

## ४२. पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी तक्रार दाखल करण्यासाठी तुम्ही कोणती पावले उचलू शकता?

अत्याचारग्रस्ताने हे पाऊल उचलण्याचे ठरवले तर याचा अर्थ संबंधित पोलिस अधिकाऱ्याविरुद्ध एफआयआर दाखल करणे असा होईल. हे एखाद्या वकील आणि स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने करणे चांगले. तुमची एफआयआर दाखल करून घेण्यात अयशस्वी ठरलेला/ठरलेले पोलिस अधिकारी कोण आहेत त्यांची नावे व हुद्दे तुम्हाला माहिती असल्यास बरे पडेल. तुमच्या मूळ तक्रारीची प्रत आणि पोलिसांकडून मिळालेली कोणतीही पावतीसुद्धा तुमची कागदपत्रे बळकट करण्यास उपयोगी ठरतील.
एसपी / डीसीपीकडे तुम्ही तक्रार केली आणि त्याने/तिने प्रकरणात लक्ष घातले नाही किंवा एफआयआर नोंदवला गेल्याची खात्री करण्यात अयशस्वी झाला/झाली तर त्याचे/तिचेही नाव तुम्ही तक्रारीत नोंदवू शकता.



**आयपीसी, कलम १६६ ए (सी) अंतर्गत, महिला अत्याचारग्रस्तांसाठी वन स्टॉप क्रायसिस सेंटरमधील पीएफओसुद्धा पोलिस अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात मदत करू शकतो.**

## ४३. पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी तक्रार नोंदवण्यात काही धोके आहेत काय?

हे जाणून घेणे महत्वाचे आहे, की आपण हे पाऊल उचलण्याचे ठरवले, तर त्यात काही धोके असू शकतात. पोलिस अधिकारी तुम्हाला धमकावण्यासाठी आणि घाबरवण्यासाठी त्यांची सत्ता आणि ताकद वापरू शकतात. ते तपासकार्यात चालढकल करत त्यांच्याविरुद्धची तक्रार मागे घेण्याची बाब तुमच्या गळी उतरवण्याचे प्रयत्न करू शकतात. मात्र लक्षात ठेवा, की तुम्हाला हे करण्यापासून परावृत्त करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या शक्ती, धमकी किंवा जबरदस्तीचा वापर करणे बेकायदेशीर आहे.

आदर्श परिस्थिती ही असेल, की पोलीस खात्याने ही वेळ येणारच नाही हे पहावे आणि ती वेळ आलीच, तर पोलिसांनी त्यांच्याविरुद्धच्या तक्रारीचा तपासावर परिणाम होऊ द्यायला नको. परंतु त्यात सामील असलेल्या अधिकाऱ्यांना एकमेकांचे संरक्षण करण्याची इच्छा असू शकते, विशेषत: जर ते एकाच पोलीस ठाण्यातील असतील.

अत्याचारग्रस्त व्यक्तीने त्यांना विश्वासू वाटणाऱ्या वकील आणि / किंवा सहाय्य करणाऱ्या व्यक्तीचा सल्ला घेणे योग्य ठरेल.

ही बाब दंडाधिकाऱ्यांच्या कोर्टाच्या निदर्शनास आणून देणे, ही एक चांगली रणनीती असू शकेल. त्यासाठी कलम १५६ (३) सीआरपीसीअंतर्गत अर्ज करा, की पोलीस एफआयआर नोंदविण्यास विलंब करत असल्याने / नकार देत असल्याने त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे.

यातून न्यायालय स्वतःच्या पुढाकारात, अंतर्निहित अधिकारांच्या बळावर पोलिसांविरुद्ध तक्रार दाखल करण्याचे आदेश देऊ शकते. अशा प्रकारे अत्याचारग्रस्त व्यक्तीला पुढाकार घेण्याची गरज न पडता ती सुरक्षित राहील. अर्थात तरीही, अत्याचारग्रस्ताला साक्षीदार मानून त्याला तपासकार्यात सहभागी होण्यास सांगितले जाऊ शकते.

# तळटीपा

१. इथला काही वाक्यांश यूएसमधील नॅशनल सेक्शुअल व्हायलन्स रिसोर्स सेंटरच्या खालील फॅक्टशीटवर आधारित आहे.
https://www.nsvrc.org/sites/default/files/Publications_NSVRC_Factsheet_What-issexual-violence_1.pdf

२. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायजेशन (२००२) वर्ल्ड रिपोर्ट ऑन व्हायलन्स ॲन्ड हेल्थ संपादन – एटिन जी. क्रुग, लिंडा एल. डाहलबर्ग, जेम्स ए. मर्सी, अॅन्थनी बी. झ्वी आणि राफेल लोझॅनो, पान १४९
https://www.who.int/violence_injuryšprevention/violence/world_report/en/full_en.pdf

३. पॉक्सो कायदा, सेक्शन २(१)(डी) नुसार अशी व्याख्या केली जाते, की '१८ वर्षांखाली वय असलेली कोणतीही व्यक्ती.'

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३च्या पहिल्या अनुसूचीच्या भाग २ नुसार; सोबतच हेसुद्धा पहा– 'दिल्ली उच्च न्यायालयाने संतोषकुमार मंडल विरुद्ध राज्य, बेल ॲप्लिकेशन नं. १७६३/२०१६, दिल्ली उच्च न्यायालय (२८ सप्टेंबर २०१६) (२०१६) एसएससी ऑनलाईन डेल ५३७८ पॉक्सोमधील गुन्ह्यांच्या स्वरूपाचा लावलेला अर्थ, जिथे कोर्टाने म्हटले आहे, अशा प्रकारे पॉक्सो कायद्याअंतर्गत कलम १२ सह पीओसीएसओ कायद्यांतर्गत दंडनीय गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हे आहेत.

५. हा सल्ला पुढील पुस्तकातून घेण्यात आलाय : 'लॉयर्स कलेक्टिव्ह वुमन्स राईट्स इनिशिएटिव्ह (२०१४) : अ गाइड फॉर सर्व्हायव्हर्स ऑफ सेक्शुअल व्हायलन्स', पान क्र ९–०,
http://www.lawyerscollective.org/wp-content/uploads/2014/04/Dos-and-Donts.pdf

६. नियम ४ (२) द प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्सेस रूल्स, २०२०

७. गृह मंत्रालय, भारत सरकार, सल्लागार (२०१३), रजिस्ट्रेशन ऑफ एफआयआर इररिसपेक्टिव्ह ऑफ टेरिटटोरियल जुरिसडिक्शन ॲन्ड झीरो एफआय़आर, १० मे : ७ ऑगस्ट २०२० रोजी मिळवलेल्या माहितीनुसार : https://www.mha.gov.in/sites/default/files/dvisoryFIR-290513.pdf as accessed on 7 ugust, 2020.

८. कलम ७ ३५७ सी, सीआरपीसी– पीडितेचे उपचार: सर्व रुग्णालये, सार्वजनिक किंवा खासगी, केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक संस्था किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने चालवल्या असतील, त्वरित, प्रथमोपचार किंवा वैद्यकीय उपचार विनाशुल्क देतील. कलम ६२६ ए, ६ ३७६, ६ ३७६ ए, ६ ३७६ बी, ६ ३७६ सी, ६ ३७६ डी किंवा भारतीय दंड संहितेच्या कलम ६ ३७ए इ अंतर्गत समाविष्ट केलेल्या कोणत्याही गुन्ह्यातील पीडितांना आणि तातडीने अशा घटनेची माहिती पोलिसांना द्यावी.

९. पॉक्सो कायद्याचे कलम १९(५), स्पेशल जुवेनाइल पोलिस युनिट किंवा स्थानिक पोलिसांना ज्या बालकाबाबत अपराध केला गेला असेल तर त्याला शुश्रूषा व संरक्षणाची गरज आहे असे वाटल्यास कारणांची लेखी नोंद करत चोवीस तासांत मुलाला निवारागृह किंवा जवळच्या रुग्णालयात दाखल करत त्याला शुश्रूषा व संरक्षण त्वरित मिळण्याची व्यवस्था करावी.

१०. महिला आणि बालविकास मंत्रालय, वन स्टॉप क्रायसिस सेंटर : इम्प्लिमेंटेशन गाइडलाइन्स फॉर स्टेट गवर्नमेंट्स/यूटी ॲडमिनिस्ट्रेटर्स डिसेंबर, २०१७, पृष्ठ १–२; २१ ऑगस्ट, २०२० रोजी मिळवलेल्या माहितीनुसार,
https://wcd.nic.in/sites/default/files/683OSCDirectory-19.03.2020_0.pdf

११. महिला आणि बालविकास मंत्रालयाची वन स्टॉप क्रायसिस सेंटर डिरेक्टरी; १९ मार्च २०२०; २१ ऑगस्ट २०२० रोजी मिळवलेल्या माहितीनुसार,
https://wcd.nic.in/sites/default/files/683OSCDirectory-19.03.2020_0.pdf

१२. महिला आणि बालविकास मंत्रालय, वन स्टॉप क्रायसिस सेंटर: इम्प्लिमेंटेशन गाइडलाइन्स फॉर स्टेट गव्हर्न्मेंट्स/यूटी ॲडमिनिस्ट्रेटर्स डिसेंबर, २०१७, पृष्ठ १–२; २१ ऑगस्ट, २०२० रोजी मिळवलेल्या माहितीनुसार,
https://wcd.nic.in/sites/default/files/683OSCDirectory-19.03.2020_0.pdf

# तळटीपा

१३. हे भारतीय दंडसंहितेचे कलम ३५४, ३५४ ए, ३५४ बी, ३४५ सी, ३५४ डी, ३७६, ३७६ ए, ३७६ बी, ३७६ सी, ३७६ डी, ३७६ ई आणि ५०९ आहेत.

१४. कलम १५४(१)(सी), सीआरपीसी : पोलिस अधिकाऱ्याने कलम १६४ च्या पोटकलम (५ ए) च्या कलम (अ) अंतर्गत न्यायाधीश दंडाधिकाऱ्यांनी नोंदवलेला व्यक्तीचा म्हणणे शक्य तितक्या लवकर मिळवावा.

१५. कलम १५४, सीआरपीसी

१६. ललिता कुमारी विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार आणि ओआरएस एआयआर २०१४ एससी १८७

१७. अधिनियम ४(३) : बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण अधिनियम, २०२०

१८. ललिता कुमारी विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार आणि ओआरएस एआयआर २०१४ एससी १८७

१९. अधिनियम ४(१) : बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण अधिनियम, २०२०

२०. अधिनियम ४(१३) : बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण अधिनियम, २०२०

२१. अनुच्छेद ३९. पॉक्सो कायदा

२२. अधिनियम ४(३)(इ) : बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण अधिनियम, २०२०

२३. दिल्ली उच्च न्यायालयाचा खालील निर्णय पहा : दिल्ली कमिशन फॉर वुमन V दिल्ली पुलिस २००९ एसएससी ऑनलाइन ऊशश्र १०५७

२४. महिला आणि बालविकास मंत्रालय : वन स्टॉप क्रायसिस स्कीम : इम्प्लिमेंटेशन गाइडलाइन्स फॉर स्टेट गवर्नमेंट/यूटी अॅडमिनिस्ट्रेशन डिसेंबर, २०१७, पृष्ठ ७, ८
https://wcd.nic.in/sites/default/files/OSC_G.pdf

२५. १९९५ एससीसी (१) १४

२६. एंगेजिंग विथ द क्रिमिनल जस्टिस सिस्टम : अ गाइड फॉर सर्वायवर्स ऑफ सेक्शुअल व्हायलन्स बाय लॉयर्स कलेक्टिव, पान २०

२७. अनुच्छेद १२ (अ) आणि (क), लिगल सर्विसेस ऑथॉरिटी अॅक्ट, १९८७

२८. अधिनियम ४(३)(एफ) : बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण अधिनियम, २०२०

२९. सीआरपीसीच्या कलम १५४(३) सांगते: पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेली माहिती नोंदविण्यासाठी पोलिस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्याने नकार दिल्यास ती व्यक्ती संबंधित पोलिस अधीक्षकांना ती माहिती, लेखी आणि टपालद्वारे पाठवू शकते. त्या पोलिस अधीक्षकाला अशा चौकशीतून हा दखली गुन्हा असल्याची खात्री तर त्याने स्वत: या खटल्याची चौकशी केली पाहिजे किंवा त्याच्या अधीन असलेल्या कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याला चौकशीचे निर्देश दिले पाहिजेत. या संहितेने सांगितलेल्या पद्धतीने आणि अशा गुन्ह्यासंदर्भात अशा अधिकाऱ्याकडे पोलिस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे असणारे सर्व अधिकार असतील.

३०. कलम १५६(३) सांगते: कलम १९० अन्वये अधिकार प्राप्त झालेला कोणताही दंडाधिकारी उपरोक्त नमूद केलेल्या तपासणीचा आदेश देऊ शकेल.

३१. ललिता कुमारी विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार आणि ओआरएस एआयआर २०१४ एससी १८७

३२. महिला आणि बालविकास मंत्रालय : वन स्टॉप क्रायसिस स्कीम : इम्प्लिमेंटेशन गाइडलाइन्स फॉर स्टेट गव्हर्नमेंट/युटी अॅडमिनिस्ट्रेशन डिसेंबर, २०१७, पृष्ठ ७, ८
https://wcd.nic.in/sites/default/files/OSC_G.pdf

# परिशिष्ट

## प्राथमिक मूल्यांकन अहवाल

| | मापदंड | नोंद |
|---|---|---|
| १ | अत्याचारग्रस्ताचे वय | |
| २ | गुन्हेगारासोबत असलेले अत्याचारग्रस्ताचे नाते | |
| ३ | शोषणाचा प्रकार आणि गुन्ह्याची तीव्रता | |
| ४ | उपलब्ध तपशील आणि मानसिक/ शारीरिक इजेची तीव्रता/ बालकाला झालेली दुखापत | |
| ५ | बालक अक्षम असल्यास (मानसिक, शारीरिक किंवा बौद्धिक) | |
| ६ | अत्याचारग्रस्ताच्या पालकांची अर्थिक स्थिती, बालकाच्या कुटुंबातील सदस्यांची एकूण संख्या, बालकाच्या पालकांचा व्यवसाय आणि मासिक मिळकतीचे तपशील | |
| ७ | बालकावर कोणतेही वैद्यकीय उपचार पूर्वी झालेले वा घडलेल्या अत्याचारामुळे सध्या सुरू असतील किंवा त्यांची गरज जाणवत असल्यास | |
| ८ | गुन्ह्यामुळे मानसिक धक्का, शारीरिक दुखापत, वैद्यकीय उपचार, चौकशी, पोलिस चाचणीमुळे शाळेतील गैरहजेरी किंवा इतर कोणत्याही कारणास्तव शैक्षणिक संधीचे नुकसान झाले असल्यास | |
| ९ | शोषणाची घटना एकदाच घडलीय की काळाच्या ओघात त्याची अनेकदा पुनरावृत्ती झालेली आहे? | |
| १० | बालकाचे पालक वैद्यकीय उपचारातून जात आहेत किंवा त्यांना काही त्रास आहे का? | |
| ११ | बालकाचा आधार कार्ड नंबर, उपलब्ध असल्यास | |

तारीख :..............................                स्टेशन हाऊस ऑफिसर

# CHRI चे उपक्रम

CHRI ने राष्ट्रकुल आणि त्यातील सदस्य देशांना मानवी हक्क प्रथा, पारदर्शकता आणि टिकाऊ विकास लक्ष्ये (एसडीजी) पूर्ण करण्याचे मानले आहे. CHRI विशेषत: धोरणात्मक पुढाकार आणि मानवी हक्कांवरील पुरस्कार, न्याय मिळवणे आणि माहितीची माहिती यावर कार्य करते. संस्थेचे संशोधन, प्रकाशने, कार्यशाळा, विश्लेषण, संघटन, प्रसारकार्य आणि विविध बाबींचा केलेला पुरस्कार, खालील मुख्य कार्यक्रमांमधून लक्षात येऊ शकेल :

## ॲक्सेस टू जस्टिस (एटीजे)

*** पोलिसी यंत्रणेत सुधारणा :** अनेक देशांमध्ये पोलिसांना नागरिकांच्या हक्काचे रक्षण करणाऱ्यांऐवजी राज्य यंत्रणेने अत्याचार करण्यासाठी जोपासलेले साधन म्हणून पाहिले जाते. यातून हक्कांचे व्यापक स्तरावर उल्लंघन होते आणि न्यायसुद्धा नाकारले जाऊ शकतो. सीएचआरआय व्यवस्थांतर्गत सुधारणांना प्रोत्साहित करते जेणेकरून पोलीस एखाद्या सत्तेचे रक्षक म्हणून कार्यरत असण्यापेक्षा कायद्याच्या राजवटीची जोपासना करण्याचे काम करतात. भारत आणि दक्षिण आशियातील CHRI च्या कार्यक्रमाचे उद्दिष्टच पोलीस सुधारणांसाठी जनतेचे समर्थन संघटित करत या मुद्द्यांवर नागरी समाजात जागृती करणे हे आहे. टांझानिया आणि घानामध्ये सीएचआरआय पोलिसांचे उत्तरदायित्व आणि त्यांचा नागरिकांशी असलेला सहसंबंध या दोन बाबींचे परीक्षण करते.

*** कारागृह व्यवस्थेत सुधारणा :** कारागृहात CHRI चे कार्य मुख्यत: पारंपरिकपणे बंदिस्त असलेल्या प्रणालीची पारदर्शकता वाढवणे आणि गैरवर्तन उघडकीस आणण्यावर भर देते. कैद्यांनी खचाखच भरलेली कारागृहं आणि कमालीचा अस्वीकार्य असलेला खटल्यापूर्वीचा स्थानबद्धता आणि कैदेचा लांबलचक काळ. यातून व्यवस्थेचे अपयश ठळकपणे अधोरेखित करण्याचे काम CHRI करते. सोबतच ती विधायक हस्तक्षेप आणि कायदेशीर मदत पुरवण्यासाठी विविध प्रश्नांबाबतच्या वकिलीतही गुंतलेली आहे. वर उल्लेखलेले बदल कारागृहाचे प्रशासन आणि न्यायाच्या सद्यःस्थितीत विधायक बदल घडवू शकतात यावर CHRI चा विश्वास आहे.

## ॲवक्सेस टू इन्फर्मेशन

**माहितीचा अधिकार :** माहितीचा अधिकार सर्वांना मिळावा यासाठी CHRI ने केलेले प्रयत्न आणि त्यांची तज्ज्ञता सर्वदूर पोचलेली आहे. CHRI विविध देशांना माहिती अधिकार (आरटीआय) कायदे मंजूर करून प्रभावीपणे अमलात आणण्यास प्रोत्साहित करते. या कायद्यांच्या विकासासाठीही नियमितपणे सहाय्य करते. विशेषत: भारत, श्रीलंका, अफगाणिस्तान, बांगलादेश, घाना आणि केनिया येथील आरटीआय कायद्यांचा प्रचार आणि अंमलबजावणी यात CHRI ला विशेष यश आले आहे. घानामध्ये आरटीआय आणि सिव्हिल सोसायटी या युतीचे सचिवालय म्हणून काम करत CHRI ने कायदा संमत करण्यासाठी अखंड केले. प्रदीर्घ संघर्षानंतर २०९ मध्ये त्यात यश आले. CHRI नियमितपणे नवीन कायद्यांची बिधायक चिकित्सा करते. हे कायदे तयार केले जाताना आणि पहिल्यांदा अमलात आणले जाताना अशा दोन्ही वेळा CHRI हस्तक्षेप करते. हा हस्तक्षेप सरकार आणि नागरी समाज यांना ते कायदे आदर्शपणे अमलात आणण्यासह त्यांची माहिती देण्यासाठी केला जातो. CHRI ला प्रतिकूल वातावरणात आणि सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न असलेल्या विविध अधिकार क्षेत्रांत काम करण्याचा अनुभव आहे. यातून नवे माहिती अधिकार कायदे विकसित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या देशांना आजवर मौल्यवान मर्मदृष्टी मिळालीय.

**साउथ एशिया मीडिया डिफेंडर्स नेटवर्क** (SAMDEN) **:** माध्यमकर्मींवरचे वाढते हल्ले अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा होणारा संकोच या मुद्द्यांकडे लक्ष वेधण्यासाठी CHRI ने दक्षिण आशियात माध्यम क्षेत्रातील व्यावसायिक व्यक्तींचे एक प्रादेशिक नेटवर्क विकसित केले आहे. हे नेटवर्क, साउथ एशिया मीडिया डिफेंडर्स नेटवर्क (SAMDEN) असा विश्वास बाळगते, की अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे अविभाजनीय असून त्याला कोणत्याही राजकीय सीमा नसतात. भेदभाव आणि धमकावणाऱ्या माध्यम व्यावसायिकांच्या

मुख्य गटाने तयार केलेले, SAMDEN ने माध्यमांवरील दबाव, माध्यमांचा आक्रसत जाणारा अवकाश आणि माध्यमांचे स्वातंत्र्य या विषयांवर प्रकाश टाकण्यासाठी खास दृष्टिकोन विकसित केला आहे. या उपक्रमांचे साहचर्य आरटीआय चळवळी आणि कार्यकर्त्यांशी जोडण्यात आले आहे.

## आंतरराष्ट्रीय स्तरावर मुद्द्यांचा पुरस्कार आणि प्रायोजन

'इझियर सेड दॅन डन' या आपल्या प्रमुख अहवालाद्वारे, विशेषतः यूएन ह्युमन राइट्स काउन्सिलमध्ये, CHRI मानवी हक्कांशी बांधिलकी ठेवणाऱ्या राष्ट्रकुल सदस्य देशांच्या अनुपालनावर लक्ष ठेवते. CHRI मानवी हक्कांबाबतच्या आव्हानांभोवती काम करते. सोबतच धोरणात्मकपणे यूएनएचआरसी, कॉमनवेल्थ सेक्रेटरीयॅट, कॉमनवेल्थ मिनिस्ट्रील ॲटक्शन ग्रुप, आफ्रिकन कमिशन फॉर ह्युमन ॲन्ड पीपल्स राईट्स आणि प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या कामकाजात गुंतलेले असते. सध्या चालू असलेल्या धोरणात्मक उपक्रमांमध्ये युनिवर्सल पिरियऑडिक रिव्यू, एसडीजी १६ च्या उद्दिष्टांचा पुरस्कार करणे, एसडीजी ८.७ साठी काम करणे, राष्ट्रकुल सदस्यांवर देखरेख ठेवणे आणि ते उत्तरदायी राहतील हे बघण्याचेही काम समाविष्ट आहे. आम्ही मानवाधिकार रक्षणकर्ते आणि नागरी समाजातील अवकाश या दोन्हींच्या संरक्षणासाठी समर्थन मिळवत त्यासाठी प्रबोधनही करतो.

## एसडीजी ८.७ : गुलामगिरीची समकालीन रूपं

२०१६ पासून, CHRI ने संयुक्त राष्ट्रांचे सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल (एसडीजी) ८.७ गाठण्याच्या मोहिमेसाठी कॉमनवेल्थला कायम प्रवृत्त केले आहे. ते उद्दिष्ट म्हणजे, सक्तीच्या श्रमांचे निर्मूलन करण्यासाठी त्वरित व प्रभावी उपाययोजना करणे, आधुनिक गुलामी व मानवी तस्करी नष्ट करत बालमजुरीच्या अतिशय वाईट रूपांना समूळ नष्ट करणे अपेक्षित आहे. तसेच यात बालसैनिकांची भरती आणि वापर थांबवण्यासह २०२५ पर्यंत सर्व प्रकारची बालमजुरी संपवणे, या लक्ष्यांचाही समावेश आहे. जुलै २०१९ मध्ये CHRI ने कॉमनवेल्थ ८.७ नावाचे नेटवर्क उभारले. या माध्यमांतून राष्ट्रकुल देशांमधील तळागाळातील स्वयंसेवी संस्था, ज्या राष्ट्रकुल देशांमध्ये समकालीन गुलामीच्या निर्मूलनाचे समान ध्येय घेऊन काम करतात, त्यांची एकत्र मोट बांधली गेली. यातून त्यांच्यात देवाणघेवाण सुलभ भागीदारी सुलभ झालीय. या नेटवर्कमध्ये पाचही प्रदेशांतून अंदाजे ६० स्वयंसेवी संस्थांचे सदस्यत्व आहे. नेटवर्क देश-विशिष्ट आणि विषयनिष्ठ प्रश्नांसंदर्भाने योग्य काम आणि सामूहिक समर्थन बळकट करण्यासाठी ज्ञानाची देवाणघेवाण करणारा मंच आहे.

ही मार्गदर्शक पुस्तिका लैंगिक हिंसाग्रस्त प्रौढ व्यक्ती आणि बालकांना मदतीसोबतच गुन्हानोंदणी प्रक्रियेत मार्गदर्शन करण्याबाबात सोप्या शब्दांत माहिती देते. त्यांच्या तक्रारी सुरवातीला पोलिस ठाण्यात नाकारल्या गेल्यास ते त्यांची नोंद करवून घेण्यासाठीच्या उपाययोजनांविषयी माहिती देतात. ठराविक प्रकरणांमध्ये गुन्हा नोंदवण्यास उशीर झाल्यास किंवा नकार दिला गेल्यास पोलिसांना जबाबदार धरण्याकरिता कोणती पावले उचलली जाऊ शकतात हे यामध्ये सांगितले आहे.


Hanns Seidel Foundation

हॅन्स सीडल फाउंडेशन
४/६, सिरी फोर्ट इंस्टिट्यूशनल एरिया,
नवी दिल्ली- ११००४९, भारत.
फोन: + ९१-११-४१६८०४००,
ई-मेल: delhi@hss.de
वेबसाइट : https//india.hss.de/

CHRI
Commonwealth Human Rights Initiative
working for the practical realisation of human rights in the countries of the Commonwealth

CHRI मुख्यालय, नवी दिल्ली ५५ ए, तिसरा मजला ,सिद्धार्थ चेंबर्स, कालू सराय, नवी दिल्ली- १०० ०१७
भारत, दूरध्वनीः +९१ ११४३१८०२०० फॅक्स: +९१ ११४३१८०२१७ इमेल: info@humanrightsinitiative.org

www.humanrightsinitiative.org @CHRI_INT